


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २१६ वा ❑ भारतीय सौर दिनांक २६ आश्विन शके १९४८, मंगळवार दि.२० ऑक्टोबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### रक्ताची नाती आणि हरवलेली माणुसकी: एक विदारक सामाजिक शोकांतिका

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

माणूस कितीही आधुनिक झाला आणि त्याने विज्ञानात कितीही प्रगती केली, तरी त्याचे खरे मूल्य त्याच्यातील संवेदनशीलतेवर आणि माणुसकीवर ठरते. परंतु, आजच्या स्वार्थी आणि आत्मकेंद्रित जगात या मानवी मूल्यांचा कसा ऱ्हास होत आहे, याचे एक अत्यंत हृदयद्रावक आणि मन सुन्न करणारे उदाहरण कर्नालमधील सुभद्रा मानव कल्याण सेवा संस्थान या वृद्धाश्रमात १५ ऑक्टोबर २०२६ रोजी घडलेल्या घटनेतून समोर आले. या घटनेने केवळ एका कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण समाजाचे विदारक सत्य वेशीवर टांगले आहे. या वृद्धाश्रमात राहणाऱ्या एका ७८ वर्षीय आजारी आणि असहाय्य वृद्धाला त्याच्याच जन्मदात्या कुटुंबाने ज्या निर्दयीपणे झिडकारले, ते पाहता रक्ताच्या नात्यांवरून कुणाचाही विश्वास उडून जावा अशीच ही परिस्थिती आहे. हा दुर्दैवी बाप गेल्या २३ वर्षांपासून आपल्या कुटुंबापासून अलग राहत होता. स्वतःचे आणि कुटुंबाचे पोट भरण्यासाठी त्याने उन्हातान्हात तब्बल १५ वर्षे रिक्षा ओढली. परंतु, उतारवय आणि त्यातच क्षयरोग (टीबी) यांसारख्या गंभीर आजाराने गाठल्यामुळे ते पूर्णपणे हतबल झाले. स्वतःचा सांभाळ करणे अशक्य झाल्याने गेल्या ६ महिन्यांपासून या वृद्धाश्रमाने त्यांना आपल्या छत्राखाली आश्रय दिला होता.

आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात मरणशय्येवर असताना आपल्या माणसांना, आपल्या रक्ताच्या नात्यांना एकदा डोळे भरून पाहावे आणि आपल्या घरी परतावे, अशी या ७८ वर्षीय बापाची तीव्र इच्छा होती. त्यांच्या विनंतीवरून आश्रमाच्या संचालकांनी त्यांच्या कुटुंबाशी संपर्क साधला. तब्बल २३ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर त्यांची पत्नी, एक मुलगा आणि दोन मुली त्यांना भेटण्यासाठी आश्रमात आले. आपल्या कुटुंबाला समोर पाहताच त्या आजारी बापाच्या डोळ्यांतून अश्रूंचा बांध फुटला. त्यांनी थरथरत्या हातांनी सर्वांसमोर हात जोडले आणि मला आपल्या घरी घेऊन चला अशी काळीज पिळवटून टाकणारी गयावया केली. परंतु, संपत्ती आणि सोयीस्कर जगण्याच्या आहारी गेलेल्या त्या कुटुंबाला जराही पाझर फुटला नाही. त्यांनी आश्रमाचे संचालक नीलू यांना अत्यंत निर्लज्जपणे आणि स्पष्ट शब्दांत सांगितले की, आम्ही या आजारी व्यक्तीला आमच्या सोबत घरी घेऊन जाऊ शकत नाही. ते मरण पावले की आम्हाला निरोप द्या, आम्ही फक्त अंत्यसंस्कार करण्यासाठी येऊ. संचालकांनी त्यांची खूप समजूत काढण्याचा प्रयत्न केला, पण त्या पाषाणहृदयी कुटुंबाने एकही शब्द ऐकला नाही आणि त्या असहाय्य बापाला त्याच्याच नशिबावर सोडून ते निघून गेले. ही घटना केवळ एका कुटुंबाची वैयक्तिक शोकांतिका राहिलेली नाही, तर आपल्या समाजात वेगाने घसरत चाललेल्या नैतिकतेचे आणि रक्ताच्या नात्यांना लागलेल्या वाळवीचे हे एक अत्यंत गंभीर लक्षण आहे. आजचे आधुनिक समाजमन किती निष्ठुर झाले आहे, याचा हा जळजळीत पुरावा आहे. ज्या बापाने आपल्या मुलांच्या भविष्यासाठी स्वतःच्या आयुष्याची राख रांगोळी केली, तोच बाप आज म्हातारपणी आणि आजारपणात कुटुंबाला एक जिवंत ओझे वाटू लागला आहे. मेल्यावर सांगा, अंत्यसंस्कार करू हे भयंकर वाक्य एका संवेदनहीन मानसिकतेचे प्रतिनिधित्व करते, जिथे माणसाची किंमत केवळ त्याच्या उपयुक्ततेवर आणि आर्थिक क्षमतेवर ठरवली जाते. माणूस जोपर्यंत कमावतो, तोपर्यंत तो हवासा वाटतो; पण त्याचे शरीर थकताच त्याला जुन्या अडगळीसारखे फेकून दिले जाते. आपण आज सिमेंटची टोलेजंग घरे बांधत आहोत, पण त्या घरांमधील नात्यांची आणि जिव्हाळ्याची ऊब मात्र कायमची नष्ट झाली आहे. तो ७८ वर्षीय बाप आज केवळ स्वतःच्या मृत्यूची वाट पाहत नाहीये, तर जिवंतपणीच मरण पावलेल्या त्या नात्यांचाही मुका शोक करत आहे. आजकाल अशा मन हेलावून टाकणाऱ्या घटना केवळ कर्नालमध्येच नव्हे,

तर देशभरात अनेक ठिकाणी वारंवार घडताना दिसत आहेत. काही महिन्यांपूर्वी पुण्यातील एका उच्चभ्रू वसाहतीत एका ९० वर्षीय वृद्ध आईला घरात एकटेच कोंडून तिची मुले परदेशात निघून गेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. तर मुंबईत एका आजारी आणि चालताही न येणाऱ्या पित्याला वर्दळीच्या रेल्वे स्थानकावर सोडून त्याच्याच पोटच्या मुलाने पळ काढला होता. कानपूरमध्येही अशीच एक घटना घडली, जिथे एका वृद्ध महिलेला रुग्णालयात दाखल करून तिच्या नातेवाईकांनी खोटा पत्ता दिला आणि ते कायमचे बेपत्ता झाले. अहमदनगर आणि नाशिकच्या महामार्गांवर रात्रीच्या अंधारात आपल्या वृद्ध आई-वडिलांना गाडीतून उतरवून पोबारा करणाऱ्या मुलांच्या बातम्या आजकाल रोजच्याच झाल्या आहेत. या सर्व घटना एकाच भयानक आजाराची लक्षणे आहेत, आणि तो आजार म्हणजे हरवत चाललेली माणुसकी. पैशांच्या आणि भौतिक सुखांच्या शर्यतीत आपण इतके आंधळे झालो आहोत की, ज्यांनी आपल्याला बोट धरून चालायला शिकवले, त्याच हातांना आपण म्हातारपणी झिडकारत आहोत. जर समाजाने वेळीच या नैतिक अधोगतीवर आत्मपरीक्षण केले नाही, तर भविष्यात रक्ताची नाती हा केवळ पुस्तकातील एक शब्द उरेल आणि प्रत्येक घराचे रूपांतर एका भकास वृद्धाश्रमात झाल्याशिवाय राहणार नाही.

# शहाजीराजे व तंजावरच्या मराठा राजांच्या समाध्यांच्या जीर्णोद्धारासाठी एकत्र येण्याचे पांडुरंग बलकवडे यांचे आवाहन

**पुणे पुस्तक जत्रामधील मराठ्यांचे दक्षिण भारतातील कर्तृत्व परिसंवादात शहाजीराजांच्या लोककल्याणकारी राज्याचे व जिंजीच्या ऐतिहासिक संघर्षाचे विस्तृत विवेचन**

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – कर्नाटकातील कनकगिरी येथील शहाजीराजांची समाधी, शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ बंधू संभाजीराजे यांची समाधी आणि तंजावर येथील व्यंकोजी राजे व इतर मराठा राजांच्या समाध्यांची मोठी दुरवस्था झाली असून या सर्व ऐतिहासिक समाध्यांच्या जीर्णोद्धारासाठी आणि संरक्षणासाठी एक विशेष समिती स्थापन करून मोहीम हाती घेण्याचे आवाहन इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांनी रविवारी येथे केले. न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथे सुरू असलेल्या २४ व्या पुणे पुस्तक जत्रेच्या निमित्ताने आयोजित मराठ्यांचे दक्षिण भारतातील कर्तृत्व या परिसंवादात ते बोलत होते.




या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत व इतिहास संशोधक डॉ. सदानंद मोरे होते, तर इतिहास अभ्यासक विक्रमसिंह मोहिते, कर्नाटकचे आमदार डॉ. मारुतराव मुळे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून जडणघडणचे संपादक डॉ. सागर देशपांडे उपस्थित होते. पुणे पुस्तक जत्रेचे संयोजक पी. एन. आर. राजन आणि समन्वयक शिरीष चिटणीस यांनी परिसंवादाचे नियोजन केले होते.

बलकवडे म्हणाले, की माहुलीच्या पराभवानंतर शहाजी राजांनी आदिलशाही सेवेत जाऊन संकटाचे रूपांतर संधीत केले आणि बंगलोर, मंगलोर ते जिंजीपर्यंतचा प्रदेश जिंकून स्वतःचे प्रभावी राज्य निर्माण केले. महाराष्ट्रात ज्याप्रमाणे लोककल्याणकारी राज्य निर्माण झाले, तसेच राज्य शहाजी राजांनी बंगलोर येथे निर्माण केले आणि अनेक भाषांच्या विद्वानांना आश्रय दिला. उत्तर भारतात हजारो प्राचीन मंदिरे उध्वस्त झाली; परंतु दक्षिण भारतात आजही प्राचीन हिंदू मंदिरे आणि संस्कृती सुरक्षित राहण्याचे अप्रत्यक्ष श्रेय शहाजी राजांना जाते. शहाजी राजांनी विजयनगर साम्राज्यातील हिंदू नायकांचे (तंजावर, त्रिचनापल्ली इ.) अस्तित्व नष्ट न करता त्यांचे रक्षण केले व त्यांचा एक संघ तयार केला. १६४२ मध्ये जिजाऊ आणि बाल शिवाजी महाराजांना पुण्याला पाठवून शहाजी राजांनी स्वराज्य निर्मितीची मूळ प्रेरणा रोवली, असे बलकवडे यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजयाद्वारे जिंजीपर्यंत राज्यविस्तार केला व औरंगजेबाच्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी दक्षिणींची बादशाही दक्षिणींच्या हाती ही राजनीती आखून विजापूर व गोळकोंड्याशी मैत्रीचे धोरण ठेवले. संभाजी महाराजांनी औरंगजेबाच्या आक्रमणावेळी विजापूर व गोळकोंड्याच्या मदतीसाठी मराठ्यांचे सैन्य पाठवले. संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर राजाराम महाराजांनी जिंजीच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. जिंजीच्या तब्बल ८ वर्षांच्या वेढ्यात (१६९०-१६९८) मराठ्यांनी ५० हजार ते १ लाखाच्या मुघल सेनेशी संघर्ष करत छत्रपतींची गादी व स्वराज्य सुरक्षित ठेवले, असे बलकवडे यांनी नमूद केले.

१८ व्या शतकातील मराठ्यांच्या दक्षिणेतील वर्चस्वाचा आढावा घेत बलकवडे म्हणाले, की १७१९ मध्ये बाळाजी विश्वनाथांनी दिल्लीकडून दखखनच्या सहा सुभ्यांचे चौथाई व सरदेशमुखीचे अधिकार मिळवले. बाजीराव पेशवे, नानासाहेब पेशवे, सदाशिवराव भाऊ आणि पेशव्यांच्या सरदारांनी (मुराराव घोरपडे, पटवर्धन इ.) कर्नाटकात मोहिमा काढून मराठ्यांचे राजकीय वर्चस्व पुन्हा प्रस्थापित केले. माधवराव पेशव्यांनी हैदर अलीचा पराभव करून कर्नाटकातील मराठ्यांचे अधिपत्य आणि अधिकार पुनर्स्थापित केले.

१६७२ च्या सुमारास शहाजी राजांचे पुत्र व्यंकोजी राजे यांनी तंजावर (तमिळनाडू) येथे मराठा राज्याची स्थापना केली, जे एक आदर्श संस्थान बनले. तंजावर ही तमिळनाडूची सांस्कृतिक राजधानी बनली असून तेथे मराठी आणि तमिळ संस्कृतीचा ऐतिहासिक संगम पाहायला मिळतो, असे बलकवडे यांनी सांगितले.

पुणे अर्काइव्हजमध्ये कर्नाटकातील ऐतिहासिक घडामोडींचे तब्बल २५ लाख कागदपत्रे (कर्नाटक दप्तर) उपलब्ध आहेत. मराठ्यांनी कर्नाटकातील प्रत्येक गावातील मंदिरांना, देवस्थानांना, विद्वानांना आणि दर्ग्यांना इनामे लावून दिली होती. तिरुपती संस्थानाची पुनर्रचना आणि व्यवस्था पेशव्यांच्या काळात झाली, असे बलकवडे यांनी नमूद केले.

महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या सांस्कृतिक व कौटुंबिक ऋणानुबंधांवर प्रकाश टाकत बलकवडे म्हणाले, की पुण्याचे अनेक प्राचीन वतनदार (ब्राह्मण, देशपांडे, कुलकर्णी), तोफखान्याचे प्रमुख, कसबा गणपतीचे पुजारी आणि चिंचवडच्या मोरया गोसावी यांचे घराणे मूळचे कानडी (कर्नाटक) होते. महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यात प्राचीन काळापासून अत्यंत घनिष्ठ कौटुंबिक आणि सांस्कृतिक संबंध राहिलेले आहेत.

समाध्यांच्या दुरवस्थेबाबत बोलताना बलकवडे म्हणाले, की कर्नाटकातील कनकगिरी येथील शहाजीराजांची समाधी आणि शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ बंधू संभाजीराजे यांची समाधी यांची मोठी दुरवस्था झाली असून भव्य स्मारकाची गरज आहे. तंजावर येथील व्यंकोजी राजे आणि इतर मराठा राजांच्या समाध्यांच्या परिसरात अतिक्रमणे व दुरवस्था झाली असून तमिळनाडू सरकारचे दुर्लक्ष झाले आहे. या सर्व ऐतिहासिक समाध्यांच्या जीर्णोद्धारासाठी आणि संरक्षणासाठी एक विशेष समिती स्थापन करून मोहीम हाती घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

परिसंवादाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. सदानंद मोरे यांनी महाराष्ट्र आणि दक्षिण भारत यांच्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिक अनुबंध अत्यंत समृद्ध असल्याचे प्रतिपादन केले. महाराष्ट्र आणि दक्षिण भारत (कर्नाटक, गोवा इ.) यांच्यात प्राचीन काळापासून घनिष्ठ ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संबंध राहिले असून छत्रपती शिवाजी महाराज आणि शहाजीराजे यांनी हे ऐतिहासिक संबंध पुन्हा दृढ करण्याचे कार्य केले आहे.

महाराष्ट्रातील संगीताचे कर्नाटकी संगीताशी अत्यंत जवळचे नाते राहिले असून मराठीतील अभंग आणि ओव्यांच्या गायनाची मुळे दक्षिण भारतीय संगीत परंपरेशी जोडलेली दिसून येतात. महाराष्ट्रात सततच्या राजकीय संघर्षांमुळे कला आणि साहित्याला पूर्ण वाव मिळण्यात मर्यादा आल्या, तरी तंजावरच्या मराठा छत्रपतींनी (भोसले घराणे) दक्षिण भारतात प्राचीन संस्कृती, संगीत आणि नृत्याला मोठा राजाश्रय दिला. तंजावरच्या राजांनी मराठी, संस्कृत, तमिळ, तेलुगू आणि कन्नड अशा पाच भाषांमध्ये साहित्यनिर्मिती केली व उत्तेजन दिले, असे डॉ. मोरे यांनी सांगितले. **(क्रमशः)**

# ''एकांताचे प्रहर:-हळवे मनस्वी चांदणं गोंदण''

ज्योतिर्मय साहित्य

''आई तुझ्या गर्भातच,
सुचल्या असव्यात मला काही कविता..
तेव्हापासून -कुणी जाणो -हे घोर या थोर
चंद्रबनातून धावले पाच सैरभैर मोर''..

आईच्या चरणी हे एकांताचे प्रहर. ही श्रद्धेय भावनेतून आलेली कविता. इतकी तरल भावबंध घेऊन आलेली आहे.आत्मिक स्वानंद भावनेचा कोलाहल जेंव्हा या सृष्टीची नितळ निर्लेप भाव मोहून टाकतात तेंव्हा कवी ज्ञानेश्वर लेंडवे यांना काव्याची एक अमोघता मिळून जाते. हाच मनोज्ञभाव या कवितेचा मर्मग्राही अनुबंध आहे. तत्वमाया, चांदणचकोर,स्पर्शमाया, स्मृतीमोहर या चार अलवार विभाग या कवितेचे सृजनशील सृजनांचे भावानुबंध आहेत.हे एकांताचे प्रहर म्हणजे एक आत्मिक स्वानंद आहे. मानवी मन हे मायाळू स्नेहाळू मायमातीचा गंध होऊन आल्यावर चंद्र अस्तानंतर पुन्हा दुःखाची घरघर,जमूनी येती डोईवर, एकांताचे प्रहर ही सृष्टीची तत्वमाया आहे.हवा पाणी व श्वासांचा ही अलाप विलाप आणि या हळव्या अंबरभेठी हे कवीचे चिंतन आशय संपन्न अधिष्ठान आहे.

''कुणी काहीही कोकलोत/
माझ्या पायाखाली लाव्हा आहे/
आणि डोक्यावर चांदण्याची शीतलता आहे./
मी मातीत गाढला गेलोय पूर्ण (उभा)/
मी पुरुन उरलोय सर्वत्र इथे तिथे/(पृ.११)

कविता ही एक सृजनशील मनाची तरलं भावना आहे.जो कवितेच्या डोहात बुडाला ती कविता तरलं मनस्वी घेऊन आलेली आहे.ही वळणवाट गाव शिवारांच्या, माळरान,निळभोर आभाळ,हे मनमुक्तपण प्रचंड विलोभनीय आहे.हे अतिशय हळुवार संवेदनेचं नितळ आभाळ आहे.एक कवी जेव्हा सजग भावानुबंधाच्या परिप्रेक्ष्यातून आपल्या मायाळू भावनेतून व्यक्त होतो तेंव्हा तत्वमायाही की या सृष्टीचा मी एक शब्द वैभवी सर्वहारा शब्दपामर आहे. ''मी पाहतो पाण्यात/माझे




दुःख/माझे डोळा/सूर्य मावळून गेल्यावर/ (पृ.१५)हे इच्छा,ही जत्रा, शून्यातून काही, मौनाच्या अथांगतेत गुंजत राहिल्या सावल्या,महाकाव्य,

डोह,पताका तसेच अख्या जगाचं दुःख मानगुटावर, ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल मनाची तरलं भावना व्यक्त करते कारण मी सदैव या मंतरलेल्या काव्यगुहेत आहे जसे ''हे एकांताचे जग/मला भिववीत नाही/हेच माझे जगणे/आणि जगण्यातूनी उमगणे/ही सविनय अस्सल परिपक्वता ही कविता देऊन जाते.या नियतीचे महाकोडे (लक्ष श्वांचे) फेरे, जन्म मरण अटळ. एक पक्षी होऊन ही कविता मुक्त आहे ते जगण्याचा मुलमंत्र देते. ही कोळोखाची लेणी हळव्या काळजात कोरलेली आहे. मौन मुक्याची ही भाषा हे देहबोलीचे स्वर होऊन येते.हा शब्दांगार मुड होऊन येतो तो गुढ अद्भुत आहे. म्हणून कवी शत् जन्माच्या संचिताचा हा काव्यानुबंध आहे. ही धुंदी शब्दमंत्राची लेणी, ही तर खरंच निर्मिती कळा या एकांताचा एक मुग्ध संवाद आहे.ज्या कवी वाल्मिकीने कशा अनुभवल्या असतील?ही खरी निर्मितीची मुल्य आहे.काव्यांग हा तळं ढवळून काढतो. ही कवितेची अगाध चिंतन चिकित्सक मर्मबंधी भाव आहे.

चांदणचकोर हा सौंदर्याचा देखना सोहळा एक मनस्वी कवी इतक्या सृजन समर्पक भावनेतून व्यक्त करतो जसे.

''माझीया स्वप्नबिंदीच्या
आभाळा/
शुभ्र
चांदण्याचा लळा/
कविता स्फुरुनी येते मनी/
तोचि
ब्रम्हानंदी
सोहळा''(पृ.४५)


कवी ज्ञानेश्वर लेंडवे


डॉ. प्रभाकर शेळके

हे चंद्रचकोरी चांदणं,भावविभोर जगणं.हा काव्यानुंबध अथांगते, चांदणरात्री गहू सोंगणीला. पाथीत आई झोपू घालायची बाया सोंगणीचं गाणं म्हणायच्या. हे गाणं कवीच्या एकांताचा प्रहार होऊन मनाला फुलतं झुलतं राहिलं म्हणून या कवितेचं नातं हे अद्वैत आहे. म्हणून ही कविता मौनाच्या तळाशी वैश्विकता शोधते आहे. चांदोबाचं झाडं, जणू महावृक्ष.मौनाला अंकुर फुटतात हे अल्लड भावविश्व पण आनंदाचं गुपित. अनेक महाकाव्ये चंद्र चांदण्यांची बरसात करते.

आईच्या अमृतवाणीचा एक सात्विक दृष्टीबळ व आईची क्षितिजापारची दृष्टी हवी कविता देऊन जाते.जसे''अंबराच्या भव्य महाली/

चंद्र गजगजते झुंबर/आई सांगते पुराणकथा/ दारात स्तब्ध औदुंबर/(पृ.४९) हे एकांताचे प्रहर म्हणजे आत्मिक चिंतनाचे वैश्विक बळ आहे.या चंद्रचांदण्याच्या कुरू क्षेत्रात, हा अत्यंत मनस्वी चांदण कवडसा उजळत येतो तो असा की, म्हातारीच्या भिंती कोजागिरी होतात. पण हा चांदण कवडसा म्हातारीच्या चरणस्पर्श करतो. म्हतारी पडक्या छपरात झोपलेली आहे. खरच या आदिम डोहातल्या सावल्या,गर्दगच्च झाडात चंद्र कारूण्याची फुले, अशी घनव्याकुळ होऊन ही कविता येते.

मोहर, अर्थ, का कोण जाणे, रस्ता, परिचिती, प्रतिभेचं देणं, विसावा, गुपित, मी चंद्रसांजेला,मुकी बासरी,

पांथस्थ, या कवितेचा मर्मग्राही आस्वादक अनुबंध म्हणजे ''पाप-पुण्याचा हिशोब हा कुण्या जन्माचा आहे/वाटा संपल्या तरी मी चालत आज आहे/(पृ.७१) या सृष्टीच्या निर्मितीच्या कळा हे असं कसं ते अंत आणि प्रारंभ हे अंतर अनादी अनंत आहे मग हे आयुष्य चांदणमय करणारे कवी मनस्वी आहेत.हा कोजागर हा प्रवास,हा एकातांचा दास, अतिशय हळवे पदर उलगडून जातात.या अनोळखी स्पर्शमाया या उत्तरार्धात कवी लिहितो ''जिथे स्तब्ध सावल्यांच्या रांगा/
तिथे माझे पाऊल थबके/
का कोण त्या झाडामधूनी/
मौनातूनी मज साद घालते/ (पृ.८१)

**(क्रमशः)**



## जात्यावरच्या ओव्या......

माय माऊलीची माया
नही मिळत उधार
फुटे दगडा पाझर
पोट पिकल्यावर ||८९७||

माय माऊलीची माया
नही पालापाचोळा
माणसा तुझ थोरपण
तिच्या मांसाचा गोळा ||८९८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक–भाग ७८

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

थोडक्यात सांगायचे झाले तर श्रीराम म्हणजे कल्पवृक्ष आहेत. कल्पवृक्ष हा इच्छिलेले देणारा असतो. त्याच्या सावलीत बसून आपण काय मागायचे हे आपल्यावर आहे. तो आपल्याला जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती देणारा आहे. कैवल्य प्रदान करणारा आहे. असा हा भगवंत आपल्या पाठीशी असताना आपण देहाची आणि संसाराची व्यर्थ चिंता वाहत असतो. माझे कसे होईल, माझ्या मुलाबाळांचे, नातवंडांचे कसे होईल अशी चिंता आपण करीत बसतो. तर कोणाला या जगाचे कसे होईल अशा प्रकारची चिंता. अशा अनेक प्रकारच्या चिंतांनी सामान्य माणूस गोंधळून जातो.

समर्थ म्हणतात, मनी मानवा व्यर्थ चिंता वाहते, अकस्मात होणार होऊन जाते. प्रारब्धानुसार जे घडायचे असते, ते घडणारच असते. आपण मात्र व्यर्थ चिंता करीत बसतो. त्यापेक्षा आपण त्याच्यावर विश्वास ठेवून सर्व भार त्याच्यावर सोपवावा. याचा अर्थ मात्र असा नाही की आपल्या वाट्याला आलेले कर्म न करता स्वस्थ बसायचे. अर्जुनाला कर्तव्यप्रवण करण्यासाठीच तर भगवंताने गीता सांगितली ना !तेव्हा त्याच्यावर विश्वास ठेवून आपल्या वाट्याला आलेले निहित कर्म उत्तम प्रकारे करावे. तोच पुरुषार्थ आहे. इतर गोष्टी परमेश्वरावर सोपवाव्यात. तुकाराम महाराज म्हणतात, ''घालू देवासीच भार, देव सुखाचा सागर.''मग देहाच्या आणि




प्रपंच्याच्या चिंता आपल्याला सतावणार नाहीत.

स्वसंवाद :




१. ''माझे कसे होईल? माझ्या कुटुंबियांचे कसे होईल?'' या विचारसरणीत अडकून मी समर्थांनी म्हटल्याप्रमाणे प्रपंचाची वृथा (व्यर्थ) चिंता करत बसलो आहे का?

२. संकटाच्या काळात मी एका पामरासारखा विचलित होऊन खचून जातो, की भगवंतावर संपूर्ण भार टाकून खंबीरपणे परिस्थितीचा सामना करतो?

३. कल्पवृक्षाप्रमाणे असणाऱ्या श्रीरामाच्या चरणी आल्यावर मी त्याच्याकडे केवळ तात्पुरती ऐहिक सुखे मागतो आहे, की चिरंतन शांती आणि मोक्षाची आस धरतो आहे?

४. तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे, ''देव सुखाचा सागर'' आहे यावर माझा पूर्ण विश्वास आहे का? मी माझे निहित कर्म करून उरलेला भार त्याच्यावर सोपवायला शिकलो आहे का? **(क्रमशः)**




## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559



✍️ आकर्षण

आकर्षण विचारांचे असावे व्यक्तींचे नाही, आकर्षण कामाचे असावे श्रीमंतीचे नाही, आकर्षण ध्येयाचे असावे मोठेपणाचे नाही, आकर्षण प्रामाणिकपणाचे असावे लबाडीचे नाही.



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# नाम घेण्याला काहीही आड येत नाही.

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आपण असे पाहू की, नामात प्रेम येण्याकरता एक एक सत्कर्म करीत राहणे सुलभ, की ते नामच विचाराने, सर्व संतांनी कळवळ्याने सांगितले आहे म्हणून, जरूर तर बळजबरीनेसुद्धा घेत राहणे, हे सुलभ ? समजा एक यंत्र आहे, त्यात पुष्कळ चक्र आहेत, आणि ते यंत्र चालू करण्याचा हेतू धरला आहे. आता एखाद्याने त्यांतले एखादेच चक्र चालू करू म्हटले तर ते चालू होईलच असा भरवसा नाही. पण त्या सर्व चक्रांचा संबंध असणारी कळ आपण दाबली, तर मात्र बिनतक्रार आणि अत्यंत अल्प प्रयासाने ते यंत्र सहज चालू करता येईल. त्याप्रमाणे, नाम ही कळ जर धरली तर सत्कर्मरूपी सर्व चक्र एकदम फिरू लागून आपले काम निश्चीतपणे आणि सुलभपणे होईल. म्हणून, हमखास आणि सहज रीतीने काम व्हावे अशी ज्याची इच्छा असेल त्याने कशाही रीतीने का होईना नाम घ्यायला लागावे. नाम घ्यायचे एकदा पक्के ठरविले म्हणजे काहीही आड येत नाही.

व्यवहारात आपण पाहतोच की, एखादी गोष्ट समर्थनीय नसली तरी करायचा निश्चय केला की मनुष्य ती करतोच. मग नाम घेण्याचा जर निश्चय केला तर का नाही होणार ? काहीही केले तरी शेवटी नामाशिवाय गत्यंतर नाही; तर मग ते घेण्यात विलंब किंवा चालढकल करण्यात काय अर्थ आहे ? म्हणून, कोणत्याही तऱ्हेच्या शंका-कुशंका न घेता, कशाही तऱ्हेने पण नाम घेत राहावे हे उत्तम; म्हणजे विनाकारण काळ फुकट घालविला अशी पश्चात्तापाची पाळी येणार नाही.

जग हे अनेक मोहक वस्तूंनी भरले आहे. त्या वस्तू आपण पाहिल्या किंवा नुसत्या ऐकल्या तरी हव्याशा वाटतात, आणि त्या मिळविण्याचा आपण प्रयत्न करतो. म्हणून देवाजवळ आपण अशी प्रार्थना करावी की, ' देवा, मोहक वस्तू मला दाखवूच नकोस, कारण माझी इच्छा तिकडे जाईल आणि मी फसेन. देवा, माझे ज्यात खरे हित आहे तेच मला दिसो, तेच मी ऐको, त्याचेच मला स्मरण होवो, आणि त्याचीच मला गोडी लागो. '

प्रह्लाद, द्रौपदी यांसारख्या भक्तांनी देवाजवळ काय मागितले ? तेच आपण मागावे, आणि त्यांनी निष्ठा ठेवली तशीच आपणही ठेवावी. त्यांच्या ठिकाणी जसे वैराग्य होते, तसे आपल्या ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करावा. प्रयत्न करीत असताना प्रथम चुका होतील, पण त्या झाल्या तर पश्चात्ताप व्हावा. ' देवा, मी फार दोषी, अपराधी आहे, मला क्षमा कर आणि तुझ्या कृपेला पात्र कर. ' पश्चात्ताप खराच झाला तर राम कृपा करीलच. मुखाने नाम घ्यावे, हाताने प्रपंचाचे काम करावे, आणि अंत:करणात समाधान ठेवावे.

जो नाम घेऊ लागेल त्याचे मन बाहेर धावण्याचे हळूहळू कमी होते.

****

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

## आपले सण, आपले उत्सव शारदीय नवरात्र

■ कुमारिका पूजन

नवरात्राच्या काळात माता भगवतिला कुमारीकेच्या रुपात पुजण्याचे फार महत्त्व आहे. म्हणून अत्यंत श्रद्धेने, वय वर्ष दोन ते दहा या दरम्यानच्या कुमारिकाना बोलावून त्यांचे पूजन करण्यात येते. त्यांना वस्त्रे दक्षिणा समर्पित करण्यात येतात. या कुमारीकाच्याच रूपात प्रत्यक्ष जगदंबा आपल्या घरात आली आहे, असा भाव ठेवल्या जातो. वय वर्ष पर्यंत ची मुलगी ही अबोध असते. म्हणून तिला कूमारीका पूजनात घेत नाहीत. दोन वर्षे वय असणारी कन्या हिला कुमारी कन्या म्हणतात. तीन वर्षांची त्रिमूर्ती, चार वर्षांची कल्याणी, पाच वर्षांची रोहिणी, सहा वर्षांची कालिका, सात वर्षांची चंडिका, आठ वर्षांची शांभवी, नऊ वर्षांची दुर्गा, आणि दहा वर्षांची सुभद्रा. या रूपात त्यांचे पूजन होते. कुमारीका पूजन केल्याने, दुःख दारिद्र्य नष्ट होते. शत्रूंचा विनाश होतो. धनाची वृद्धी होते.

■ कोणत्या कन्येचे पूजन होत नाही

कोणते अंग नसलेली, कोढ असलेली, जखमी असलेली, शरीरातून दुर्गंध येणारी, जन्मांध तिरळी, कुरूप, रोगी, व रजस्वला अशा कन्याचे पूजन केले जात नाही.




### "कर्म; मन आणि प्रयत्न"

मित्रांनो आणि वाचकहो व सर्व बंधूभगिनिनो, आपले जीवन जगत असताना या तिनही गोष्टीचे सतत स्मरण ठेवून जगावे.पहिले कर्म म्हणजे कार्य केल्याशिवाय तुम्ही जीवन जगू शकत नाही.म्हणून कर्म तर करावे पण प्रत्येक कर्म ईश्वराला समर्पित असावे.म्हणजे मन नेहमी विनम्र असावे.. कार्याचा गर्व मनाला होऊ देऊ नये.आणि तिसरी गोष्ट तुमचे प्रयत्न.."दे रे हरी पंलगावरी"असे नसावे. म्हणून ईमानदारीने, नेकीने प्रयत्न करून विनम्र मनाने ईश्वराला समर्पित करावे. ईश्वराला योग्य कार्य करण्यासाठी शक्ती; कठीण परिस्थितीत सुध्दा धैर्य व कोणत्याही वेळी तुझी सय येण्याची कृपा माझ्यावर करावी. माझ्यातील अंहकार अनावश्यक चिंता आणि आपल्या इच्छेनुसार फल मिळेल असा आग्रह करू नये. मला माझे कर्तव्य व जबाबदारी समजू दे. मी फक्त कर्म करून त्याचा फल व परिणाम याची चिंता करणार नाही! आणि मित्रांनो, आजच्या जीवनात शांती, सुखी जीवन जगण्याची ईच्छा करू या.. भगवतगीता आपणास हेच शिकविते. आज एवढे पुरे. आवडले तर लाईक शेअर करा आणि वाचत राहा सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा. आपला दिवस सद्गुरूकृपेने आनंदी जावो सुप्रभात.



# लिंबूचे आयुर्वेदिक फायदे

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

लिंबात व्हिटॅमिन-सी चे प्रमाण खूप जास्त असते. हे शरिरासाठी अँटिऑक्सिडंट म्हणून कार्य करते, जे मुक्त रॅडिकल्सला तटस्थ करते. व्हिटॅमिन-सी मुळे हृदयविकार, पक्षाघात आणि कमी रक्तदाबाचा धोकाही कमी होतो. सरासरी आकाराच्या लिंबाच्या रसात ३१ पर्यंत व्हिटॅमिन-सी असते, तर प्रौढ व्यक्तीला दररोज ६५ ते ९० व्हिटॅमिन-सी आवश्यक असते.



वजन घटवण्यात मदत करतो : लिंबूत असलेले पॉलीफेनॉल अँटीऑक्सिडंटमध्ये वजन कमी करण्याचे गुणधर्म आहेत. लिंबूत असलेले अँटिऑक्सिडंट्स रक्तातील ग्लुकोजची पातळी कमी करून इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता सुधारू शकतात. या दोन्ही गोष्टी टाईप-२ मधुमेहाचे मुख्य कारण मानल्या जातात.

त्वचा सुधारते : लिंबूत असलेले व्हिटॅमिन-सी हे त्वचेवरील सुरकुत्या कमी करते. तसेच, त्वचेचा एजिंग पासून (वृद्धत्वापासून) बचाव करते आणि उन्हामुळे होणाऱ्या नुकसानापासून त्वचेचे रक्षण करते.

पचनक्षमता मजबूत होते : बद्धकोष्ठतेपासून आराम मिळावा यासाठी सकाळी लिंबू पाण्याचे सेवन करावे. कोमट पाण्यात लिंबू मिसळून प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. लिंबू पाण्याने पचनक्रिया सुधारते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

नैसर्गिक ब्रेथ फ्रेशनर : अनेक वेळा लसूण, कांदा किंवा मासे खाल्ल्यानंतर तोंडाला दुर्गंधी येते. लिंबू पाणी प्यायल्याने श्वासाच्या दुर्गंधीची समस्या दूर होते. तसेच लिंबू लाळ उत्तेजित करते.

*मुतखड्याच्या आजारात मदत होते* : लिंबात असलेले सायट्रिक ॲसिड मुतखड्याचा धोका कमी करू शकते. सायट्रिक ॲसिड मध्ये सायट्रेट नावाचे संयुग असते, जे लहान लहान मुतखड्याचे स्टोन्स फोडण्यास मदत करते.

ॲनिमियापासून बचाव करते : लोहाच्या कमतरतेमुळे होणारा अशक्तपणा म्हणजेच ॲनिमिया हा एक अतिशय सामान्य आजार आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला अन्नात पुरेसे लोह मिळत नाही, तेव्हा याचा त्रास होतो. लिंबूत काही प्रमाणात लोह असते.

हृदयाला हेल्दी ठेवते : जर एक लिंबू संपूर्ण खाल्ले तर शरिराला ५२% व्हिटॅमिन-सी मिळू शकते. लिंबूपाणी प्यायल्याने व्हिटॅमिन-सी भरपूर प्रमाणात मिळते. व्हिटॅमिन-सी मुळे हृदयविकार आणि स्ट्रोक्सचा धोका कमी होतो. तसेच, लिंबूत असलेले फायबर आणि प्लांट कंपाऊंड देखील हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी फायदेशीर ठरतात.

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### सिद्धीदात्री

नवरात्रीच्या नवव्या दिनी
देवी माता सिध्दीदात्रीची
मनोभावे पूजा करुया
कमलावर आरुढ माता
वंदन करुन देवीचे
गुणगान मुखी गावूया

देवी सिद्धीदात्री मातेने
कमळ,शंख,चक्र,
गदा हाती घेतलेले
यश,धन,बलप्राप्ती,
सिध्दी नि मोक्षासाठी
भक्तांनी देवीस पूजलेले

# न्यायनिष्ठेचा तेजस्वी दीपस्तंभ : न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे!

ज्योतिर्मय साहित्य

का इतिहासातील व्यक्ती काळाच्या ओघात विस्मृतीत जात नसतात! त्यांचे जीवन आदर्श प्रत्येक काळात मार्गदर्शक ठरत असतात. ही सत्तेपेक्षा न्याय श्रेष्ठ, व्यक्तीपेक्षा कर्तव्य महान आणि धर्मापेक्षा कोणीही मोठे नाही, हा आदर्श आपल्या आचरणातून समाजासमोर ठेवणारे पेशवेकालीन महान न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांचे स्मरण म्हणजे न्याय, नीती आणि निःस्पृहतेच्या तेजस्वी परंपरेला केलेले अभिवादन होय! मराठेशाहीच्या इतिहासात अनेक पराक्रमी योद्धे, मुत्सद्दी राज्यकर्ते आणि कर्तृत्ववान पेशवे होऊन गेले. परंतु हातात तलवार नसतानाही केवळ सत्यनिष्ठा, निर्भीडपणा आणि न्याय बुद्धीच्या सामर्थ्यावर इतिहासात अजरामर झालेले एक असामान्य व्यक्तिमत्त्व म्हणजे न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे!



**राजकर्तव्य हेच श्रेष्ठ कर्तव्य!**

थोरले माधवराव पेशवे हे धार्मिक वृत्तीचे होते. त्यांच्या स्नानसंध्या व धार्मिक अनुष्ठानां मध्ये बराच वेळ जात असल्या चे पाहून रामशास्त्रींनी त्यांना परखडपणे राजकर्तव्याची जाणीव करून दिली. 'आपण ब्राह्मण असलात तरी आता राज्यकर्ते आहात! त्यामुळे स्नानसंध्येत अधिक वेळ घालविण्याचा आपणास अधिकार नाही. प्रजेचे हित, राज्यकारभार आणि प्रजापालन हाच आपला खरा राजधर्म आहे!' अशा आशयाचा सल्ला देण्याचे नैतिक धैर्य रामशास्त्रींकडे होते. धर्माचरणाला विरोध नव्हे, तर वैयक्तिक धार्मिक आचरणा पेक्षाही सार्वजनिक कर्तव्याला प्राधान्य दिले पाहिजे, ही त्या मागील उदात्त भूमिका होती.

**न्यायासनासमोर पेशवेही सामान्यच!**

रामशास्त्रींच्या न्यायनिष्ठेची सर्वाधिक स्मरणीय घटना म्हणजे नारायणराव पेशव्यांच्या खुनाचे प्रकरण! नारायणरावांच्या हत्येनंतर संशयाची सुई त्यांचेच काका राघोबादादा पेशवे यांच्याकडे वळली. सत्तेचा दबाव, राजकीय परिस्थिती आणि संभाव्य परिणाम यांची पर्वा न करता रामशास्त्रींनी या प्रकरणात अत्यंत कठोर भूमिका घेतली. प्रचलित ऐतिहासिक कथनानुसार त्यांनी राघोबादादांना 'देहान्त प्रायश्चित्त' सुनावले.

न्यायासनावर बसलेल्या व्यक्तीला समोरचा माणूस किती सामर्थ्यवान आहे, कोणत्या घराण्यात जन्माला आला आहे किंवा त्याच्या हातात किती सत्ता आहे, याच्याशी देणे घेणे नसते. न्यायदेवते समोर राजा आणि रंक समान असतात, हा आदर्श रामशास्त्रींनी आपल्या कृतीतून अधोरेखित केला.

या निर्णयाच्या अंमलबजावणी बाबत त्यांनी घेतलेली कठोर भूमिका आणि पुणे सोडण्याचा त्यांचा निर्धार याविषयी इतिहास परंपरेत अनेक उल्लेख आढळतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील निःस्पृहता आणि तत्त्वनिष्ठेचे ते प्रतीक मानले जाते!

**धर्मनिष्ठा आणि सामाजिक विवेक यांचा संगम!**

कांही इतिहासातील व्यक्तीमत्व काळाच्या ओघात विस्मृतीत जाणारे नसतात. रामशास्त्री हे स्वतः अत्यंत धर्मपरायण होते. नित्य अग्निहोत्र, धार्मिक आचार आणि वैयक्तिक जीवनातील शिस्त यांना त्यांनी महत्त्व दिले. मात्र धर्मनिष्ठा म्हणजे अन्यायाचे समर्थन नव्हे, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. तत्कालीन सामाजिक रूढींच्या पार्श्वभूमीवर विधवा पुनर्विवाहाबाबत त्यांच्या उदार दृष्टिकोनाचेही उल्लेख आढळतात.

न्यायदान करताना जात-पात, गरीब-श्रीमंत, उच्च-नीच अथवा सत्ताधारी-सामान्य असा भेदभाव त्यांच्या तत्त्वात बसणारा नव्हता. व्यक्तीचे सामाजिक स्थान नव्हे, तर सत्य, पुरावा आणि न्याय्यतेला महत्त्व देणे, हीच त्यांच्या न्यायविचाराची ओळख होती.

**राज्यहितासाठी समर्पित कर्मयोगी!**

रामशास्त्री केवळ न्यायनिवाडा करणारे न्यायाधीश नव्हते, तर राज्याच्या हिताचा दूरदृष्टीने विचार करणारे मार्गदर्शकही होते. युद्धनीती, युद्धासाठी होणारा खर्च, पेशवे परिवारातील आर्थिक व्यवहार, राज्याच्या उत्पन्न-खर्चाचा समतोल आणि विविध निर्णयांमुळे होणारे सामाजिक व आर्थिक परिणाम अशा महत्त्वाच्या विषयांवर ते थोरल्या माधवराव पेशव्यांना मार्गदर्शन करीत असत.



डॉ.श्याम वा.कुलकर्णी, महाळुंगे,पुणे, मो. 98238 09656

राज्यकर्त्याने वैयक्तिक सुखसोयींपेक्षा रयतेच्या कल्याणाचा विचार केला पाहिजे, सार्वजनिक संपत्तीचा विनियोग जबाबदारीने केला पाहिजे आणि सत्तेचा उपयोग स्वार्थासाठी नव्हे तर लोकहितासाठी झाला पाहिजे, हा त्यांच्या विचारांचा गाभा होता.

पेशवाईच्या सेवेत त्यांनी आपल्या आयुष्याचा प्रदीर्घ काळ व्यतीत केला. भगव्या ध्वजाशी असलेली निष्ठा ही कोणत्याही एका व्यक्तीशी किंवा पदाशी बांधलेली नव्हती; ती स्वराज्याच्या मूल्यांशी, न्यायाशी आणि कर्तव्याशी जोडलेली होती.

**आजच्या काळातही रामशास्त्रींचा आदर्श तितकाच प्रेरणादायी!**

आज समाजजीवनात सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा आणि राजकीय प्रभाव यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले दिसते. अशा परिस्थितीत रामशास्त्री प्रभुणे यांचे जीवन आपल्याला एक अत्यंत महत्त्वाचा संदेश देते.

न्यायाधीशाची खरी ताकद त्याच्या पदात नसते, तर त्याच्या निःपक्षपाती विवेकात असते. राज्यकर्त्याची खरी प्रतिष्ठा सत्तेत नसते, तर त्याच्या प्रजाहितदक्षतेत असते. आणि माणसाची खरी उंची त्याच्या संपत्तीत नसते, तर त्याच्या चारित्र्यात असते!

सत्ताधाऱ्यांना सत्य सांगण्याचे धैर्य, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची जिद्द आणि कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडण्याची निःस्पृहता हेच रामशास्त्रींच्या जीवनाचे चिरंतन संदेश आहेत.

१५ ऑक्टोबर १७८९ रोजी या महान न्यायपुरुषाची जीवनज्योत मालवली. मात्र त्यांनी प्रज्वलित केलेला न्यायनिष्ठेचा नंदादीप आजही भारतीय समाजमनाला प्रेरणा देत आहे.

न्याय विकला जाऊ शकत नाही, सत्य सत्तेपुढे झुकत नाही आणि कर्तव्यनिष्ठ माणूस काळाच्या पडद्याआड गेला तरी त्याचे विचार कधीच मरत नाहीत! रामशास्त्री प्रभुणे हे केवळ पेशवाईचे न्यायाधीश नव्हते, तर भारतीय न्यायपरंपरेतील सदसद्विवेकबुद्धीचे तेजस्वी प्रतीक होते.

**त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करताना एवढीच प्रार्थना**

समाजाला रामशास्त्रींसारखे निःस्पृह न्यायाधीश, माधवरावांसारखे कर्तव्यदक्ष राज्यकर्ते आणि सत्यासाठी निर्भयपणे उभे राहणारे नागरिक लाभोत!

न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!





# पंढरपूरच्या विठ्ठलचरणी प्रा. शंकर विधाते यांची स्वरसेवा

## शास्त्रीय गायन आणि भजनांनी रंगली भक्तिमय संध्या; रसिकांकडून उत्स्फूर्त दाद

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - डॉ.(सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात कार्यरत असलेले आणि ग्रामीण भागातून आपल्या गायनकलेच्या बळावर संगीत क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे प्रा. पंडित शंकर विधाते यांनी पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आयोजित नवरात्र संगीत महोत्सवात शास्त्रीय गायन आणि भजनांच्या माध्यमातून श्री विठ्ठलचरणी स्वरसेवा अर्पण केली. संत तुकाराम महाराज भवन येथे झालेल्या या संगीतसेवेने वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले. संगीतप्रेमी आणि भाविकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे ही भजनसंध्या विशेष रंगली.

शास्त्रीय संगीताची अभिजातता आणि भक्तिसंगीतातील भावपूर्णता यांचा सुरेख संगम विधाते यांच्या गायनातून अनुभवायला मिळाला. त्यांच्या सादरीकरणात रसिक तल्लीन झाले होते. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद देत प्रा. शंकर विधाते आणि त्यांच्या साथीदार कलाकारांवर पुष्पवृष्टी केली. संगीत क्षेत्रातील नामवंत कलाकारांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली, तर भाविक आणि संगीतप्रेमींनीही गायनाचा मनमुराद आनंद घेतला.

या स्वरसेवेत प्रा. विधाते यांना प्रा. गणेश कोटीये यांनी गायनसाथ केली. संदीप गुंजकर यांनी तबला, शिवराज चव्हाण यांनी पखवाज, प्रतीक साळुंके यांनी संवादिनी आणि बाळासाहेब यांनी टाळसाथ केली. दिलीप शिरसाठ यांनी निवेदनाची जबाबदारी सांभाळली. सर्व साथीदारांच्या सुरेल साथसंगतीमुळे गायन सादरीकरण अधिक प्रभावी ठरले.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने पंढरपूरच्या पवित्र भूमीत गायनसेवेची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रा. विधाते यांनी समितीचे मनःपूर्वक आभार मानले. विठ्ठलचरणी संगीतसेवा अर्पण करण्याची संधी ही आपल्या संगीतसाधनेतील आनंददायी आणि अविस्मरणीय अनुभूती असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

ग्रामीण भागातून पुढे येत आपल्या सांगीतिक साधनेच्या जोरावर संगीत क्षेत्रात ठसा उमटविणाऱ्या प्रा. शंकर विधाते यांच्यासाठी पंढरपूरच्या पावन भूमीत विठ्ठलचरणी स्वरसेवा अर्पण करण्याचा हा सोहळा त्यांच्या सांगीतिक प्रवासातील अविस्मरणीय पर्व ठरला.

# प्लेस्कोच्या दांडिया महोत्सवाला युवा वर्गाचा प्रतिसाद

ज्योतिर्मय साहित्य



पुणे - पिंपरी चिंचवड मधील तमाम युवा वर्गाचे आकर्षण ठरलेल्या प्लेस्को फाउंडेशन आणि नाना काटे सोशल फाउंडेशनच्या '' दांडिया नाईटस '' ला परिसरातील देवी भक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पिंपळे सौदागर येथील स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणांवर तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात सर्वोत्कृष्ट वेशभूषा, नृत्य आणि गीतगायन स्पर्धांमध्ये दहा हजारांहून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवत जल्लोषात उत्सव साजरा केला. शुक्रवार दि. १७ रोजी प्रारंभ झालेल्या या रंगारंग कार्यक्रमाची सांगता रविवार दि. १९ रोजी झाली. आपल्या संस्कृतीनुसार नवरात्र उत्सवानिमित्त विविध कलागुणांना वाव देण्यासाठी गेल्या पाच वर्षांपासून दांडिया अंतर्गत नृत्य - गायनाच्या स्पर्धा आयोजित करण्याचा हा उपक्रम चालू असून दरवर्षी परिसरातील नागरिक तसेच युवावर्गाचा प्रतिसाद वाढत असल्याचे प्लेस्कोचे संचालक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवानेते उमेश काटे यांनी सांगितले.





**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**



# श्रीरामरक्षास्तोत्र

## मराठी भावानुवाद सहीत

**भावानुवादकार - माधव मनोहर जोशी.**

✍आपदांअपहर्तारं दातारम् सर्व संपदाम्
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमामि अहं
।३६।।
➡️ मराठी भावानुवाद ----
संकट हारक, वैभव दायक,
सकल जगाला आनंद दायक
ऐसा ह्या जगी असे जो श्रीराम
पुन्हा पुन्हा त्याला माझे प्रणाम ।।३६।।
✍भर्जनं भवबीजानामर्जनं सुखसंपदाम् ।
तर्जनं यमदूतानां रामरामेति गर्जनम् ॥३७॥
➡️ मराठी भावानुवाद ---
जाळण्यास संसारी दुःख
मिळवण्यास समृद्धी सुख
भिवविण्यास ते यमदूत
करा रामनाम जप गर्जत ||३७||
✍ रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे ।
रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः
॥३८॥
➡️ मराठी भावानुवाद ---
विजय असो नृपश्रेष्ठ अशा प्रभू श्रीरामाचा
राम नि विष्णूस भजितो, मी हा दास तयांचा
ज्याने नष्ट केले, दुष्ट निशाचर राक्षस समूहाला
वंदन करितो मी, अशा त्या प्रभू श्रीरामाला
||३८||
✍ रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहम् ।
रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुद्धर ॥ ३९||
➡️ मराठी भावानुवाद ---
मी तर असे श्रीरामाचा दास, कुशल ना कोणी रामाहून
उद्धर मजला हे श्रीरामा, होवो मम चित्त तुझ्यात विलीन ||३९||
✍रामरामेति रामेति रमे रामे मनोरमे ।
सहस्त्रनामतत्तुल्यं रामनाम वरानने ॥ ४० ॥
➡️ मराठी भावानुवाद ---
(शंकर हे पार्वतीला सांगतात) ---
हे सुमुखी, मी रमलोतो मनभावन अशा त्या श्रीरामात
एक रामनाम असे बरोबर,विष्णू सहस्र नामाच्या साथ ||४०||
इति श्रीबुधकौशिकविरचितं
श्रीरामरक्षास्त्रोत्रं सम्पूर्णम् ।।
➡️ मराठी भावानुवाद ---
बुधकौशिक ऋषींनी रचलेले
रामरक्षा स्तोत्र संपूर्ण जाहले ||
*******************************
केली माधवाने,भाषांतराची फोड
हा भावानुवाद, मानून घ्यावा गोड ||
केला शुभारंभ, श्रीराम नवमीला
सांगता केली, हनुमान जन्मोत्सवाला ||



# ॥ श्री गणेश चिंतन ॥

*समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"*

**कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे**

लक्ष्मी → मिळते आणि जाते.
मोक्षलक्ष्मी → बंधनातून मुक्त करते.
म्हणून सद्गुरूंची संपत्ती बाहेरची नसून–आत्मस्वरूपाची संपदा आहे.
८. स्वर्गसंपत्तीही काळाच्या अधीन
स्वर्गलोक इंद्र संपती । हे काळांतरीं विटंबती ।
सद्गुरुकृपेची प्राप्ती । काळांतरीं चळेना ॥ २८॥
स्वर्गही काळाच्या क्षेत्रात आहे.
इंद्राचे ऐश्वर्यही परिवर्तनशील.
म्हणून समर्थांची तुलना फार स्पष्ट होते–
स्वर्गसंपत्ती – कालबद्ध
सद्गुरुकृपा – कालातीत फल देणारी
पुन्हा लक्षात घ्यायचे–"कृपा" म्हणजे बाहेरून मिळालेली एखादी वस्तू नव्हे.ती ज्ञानप्राप्तीची अंतर्गत परिपक्वता म्हणूनही समजता येते.
९. मग समर्थ शेवटी सर्वात मोठे विधान करतात
हरीहर ब्रह्मादिक । नाश पावती सकळिक ।
सर्वदा अविनाश येक । सद्गुरुपद ॥२९॥
इथे "सद्गुरुपद" हा शब्द आपण जपून समजून घेतला पाहिजे.
समर्थ एखाद्या मानवी देहाला "अविनाशी" म्हणत आहेत असा अर्थ घेणे योग्य नाही.
"सद्गुरुपद" म्हणजे–सत्याकडे नेणारे ते तत्त्व, ज्ञान आणि आत्मस्वरूपाची दिशा.
देह नाशवान.उपाधी नाशवान.संपत्ती नाशवान.स्वर्ग नाशवान.
पंचभूतांचे विश्वही परिवर्तनशील.पण ज्या सत्यात या सर्वांचा अनुभव येतो ते चैतन्य–ते अविनाशी.
१०. आणि मग समर्थ स्वतःच निष्कर्ष देतात
तयासी उपमा काय द्यावी । नाशिवंत सृष्टी आघवी ।
पंचभूतिक उठाठेवी । न चले तेथें ॥३०॥
आता सगळ्या उपमा संपल्या.
सूर्य नाही.शेष नाही.पाणी नाही.अमृत नाही.कल्पतरू नाही.
चिंतामणी नाही.कामधेनू नाही.लक्ष्मी नाही.स्वर्गही नाही.
कारण–ही सारी पंचभौतिक सृष्टी आहे.
आणि सद्गुरुतत्त्व ज्या सत्याकडे निर्देश करते ते–पंचभूतांच्या आधीचे, त्यांना व्यापणारे आणि त्यांच्या परिवर्तनाचे साक्षी असलेले तत्त्व.



# महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

## 'गुरू' - अज्ञानातून प्रकाशाकडे नेणारा चैतन्यदीप

'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते'. ज्ञानासारखी पवित्र गोष्ट या विश्वात दुसरी कोणतीही नाही, असा भगवद्गीतेतील हा अमर श्लोक आहे. असे हे परमपवित्र ज्ञान ज्यांच्याकडून आपल्याला प्राप्त होते, ती पूजनीय व्यक्ती म्हणजे 'गुरू'! पंचमहाभूतांपासून बनलेल्या आपल्या या नश्वर देहात डोळ्यांची केवळ एक बाह्य दृष्टी असते; परंतु अज्ञानाचा पडदा दूर करून ज्ञानाचा तिसरा नेत्र उघडून देणारी आणि आपल्याला आपल्या आत्मस्वरूपाचे दर्शन घडवणारी व्यक्ती जर कोणी असेल, तर ती म्हणजे गुरू! म्हणूनच गुरूचा महिमा अपरंपार आहे; त्याचे वर्णन करायला शब्दही अपुरे पडतात. आजच्या या भागात आपले ज्यांच्याशी जन्माजन्मांतराचे आत्मिक नाते असते, अशा गुरूंबद्दलच जाणून घेण्याचा आपण प्रयत्न करू या.

'नात्यांचं महावस्त्र' विणताना आपण आतापर्यंत आई, बाबा, आजी, आजोबा, मामा, मावशी, आत्या, काका, बहीण-भाऊ, पती-पत्नी, आई-मुलगी, बाप-लेक आणि वडील-मुलगी या कौटुंबिक व रक्ताच्या रेशमी पदरांचा समृद्ध प्रवास अनुभवला. हे सर्व पदर घराच्या सुरक्षित चौकटीत आपल्याला मायेची आणि कर्तव्याची ऊब देतात. पण जेव्हा मानवी जीवन केवळ घरापुरते न राहता जगाच्या विस्तीर्ण प्रांगणात उभे ठाकते, तेव्हा या महावस्त्राला रक्तापलीकडच्या एका अलौकिक, शाश्वत आणि पवित्र नात्याची जोड लागते. ते सर्वोच्च, वंदनीय आणि जीवन उद्ध्वस्त होण्यापासून वाचवणारे नाते म्हणजेच 'गुरू'!

# अस्तित्वाचा जयघोष.......

**ज्योतिर्मय साहित्य**

इतक्यात अनुभवावर फार लिहावं वाटतं.... मात्र मध्ये कर्तव्यदक्षतेचा जॉब सांभाळतांना अगदी दक्षतेने काही नियमांच्या चौकटीतून वेळ कसा काढावा हा मोठा प्रश्न....

नवरात्रीच्या धावपळीत अंतर्मनात जपलेल्या माझ्या काही निवडक सख्यांवर लिहावं वाटतं.... ज्याचं अस्तित्व आपल्या काळजात आपण सांभाळून ठेवतोय. त्यांच्यावर जीव ओतून प्रेम करतोय. कारण जन्मोजन्मीचा हा संबंध असेल. म्हणूनच आज एका सोज्वळ, प्रेरणादायी तितकीच कणखर, लोभस आणि कित्येक संकटाचा सामना करून सकारात्मकतेतून स्वतःची स्वतंत्र पायवाट प्रकाशित करणारी माझी सखी (मंजूवहिनी). मात्र वृषाली वानखडे या नावाने समाजात ओळख निर्माण केलेली.

प्रिय मंजूवहिनी... हे एक मनातलं पत्र .. आजपर्यंत अनेकदा तुमच्यावर थोडंफार लिहिले. साधारण २६ वर्षे आधी तुम्ही माझ्या आयुष्यात आल्यात. तसे बघितले तर शेजारच्या वानखडे काकूंच्या तुम्ही लहान सुनबाई. पण ही ओळख आपल्यासाठी कधीच नाही. कारण लग्नानंतर जेव्हा तुम्ही शिक्षक कॉलनीत आल्यात तेव्हा तुम्ही माझ्याच आहात असे वाटू लागले. इथे शेजारी म्हणून दुरवर मनात आले नाही. कारण तुम्ही तुमच्या कृतीतून मला आपलंस केलं होतं. कॉलेजमधून घरी आले की मधली वॉलकंपाउंडची भिंत मला फार त्रासदायक वाटायची. कारण त्या भिंतीवरून उडी मारून मी सहज तुमच्याजवळ यायचे. मला मनातली प्रत्येक गोष्ट तुम्हाला कधी सांगणार असे व्हायचे. आणि तुम्ही दिवसभरात काय घडलं हे माझ्याजवळ बोलायच्या. माझी आई -बाबा शाळेतून आले की घरच्या कामाची लगबग असायची तरीही तितक्या वेळात मी तुमची भेट घेऊन मनभर बोलून अभ्यासाला लागायचे. नवरात्र आले की आपली सकाळची पाच वाजताची दररोजची नऊ दिवसाची पायदळ वारी आठवते वहिनी. आणि मी परत त्याच दिवसात रमून जाते. मात्र लगेच तुमचा संघर्ष आठवतो आणि मन सुन्न होऊन जाते.

वहिनी, आदर्श शिक्षक असलेले तुमच्या आई -बाबांची प्रेरणा नक्कीच तुमच्यात आहे. स्वतः मेहनत करून जिद्दीने आकाश गाठायचं. तुम्ही घरी वॉटर फॉल, आईसक्रीम आणि असंख्य प्रकारचे पेंटिंग्ज,इलीमेन्ट्री क्लास घेत होत्या. कितीतरी कॉलेजमुली दुरदुरून तुमच्या क्लासला यायच्यात आणि तुमच्याच सोबत एकरूप व्हायच्यात. दिवसभर तुम्ही विद्यार्थ्यांच्या गोतावळ्यात,धावपळीत असायच्या आणि रात्री दादा आले की त्यांचे जेवणाचे करून पुन्हा ऑर्डरचे पेंटिंग्ज बोर्ड करीत राहायच्या. कित्येकवेळा तर ऑर्डरचे घेतलेले रात्रभर पेंटिंगबोर्ड पूर्ण करायच्या आणि मी कॉलेजला जातांना आपण फ्रेमिंगशॉप कडे फ्रेमसाठी देत होतो. पुन्हा कॉलेजमधून आल्यावर आपण ते बोर्ड आणायला जात होतो. जणू आपला नित्यक्रम झाला होता. वेळेचे वेळापत्रक सांभाळून तुम्ही कितीतरी कामे करायच्या. साकेत छोटा असतांना तर आपण कितीवेळा वेळेवर पेंटिंग्जचे सामान आणायला जात होतो. नंतर साकेत चे प्लेहाऊस, २ पर्यंत सकाळी त्याला शाळेत पोहोचून दादांचे टिफिन तयार करून लगेच तुमचे पेंटिंग क्लास सुरु व्हायचे आणि मी कॉलेजला तुम्ही दिवसभर धावपळीत. दादाचा रात्री जर जोरात बोलायचा आवाज आला तरी मी घाबरायचे. तुम्ही मात्र कसं सहन करताय याच विचारात असायचे. सुरुवातीला तुमचे बाबा आलेत भेटीला तर तुम्ही तुमच्या संसारात आनंदात आहात असेच वागत होत्या. पण बाबांनी ओळखले आणि माझ्या बाबांना घरी येऊन बोलले की.'' मंजूवर लक्ष ठेवा. फार हळवी आहे ती. बाकी काहीच सांगत नाही, स्वतः सहन करून जगत आहे. फार काळजी वाटते तिची. '' असे बोलतांना त्यांच्या डोळ्यात पाणी भरून होते. मला फार रडायला आले. पण मी तेव्हा बाबांना काळजी करू नका असेच बोलले. आजही वहिनी हे लिहितांना हात थरथरतात आणि कित्येक प्रसंग डोळ्यासमोर येउन उभे राहतात. कितीतरी भयावह प्रसंगातून तुम्ही जातांना मी स्वतः बघितले. तुमचे आई -बाबा, दादा, वहिनी, ताई, जीजू या सर्वांना तुमची आणि साकेतची चिंता सतावत होती. एकदा तर तुमची आई सुट्या काढून आलेल्या. लेकीचा संसार डळमळीत असेल तर आई बाबांची काळजी फार वाढते हे मी तेव्हा अनुभवले.



दादांचे ड्रिंक घेणे आणि तुमचे सहन करणे हे प्रसंग माझ्यासाठी फार वेदनादायी होते. त्यात साकेत अगदी छोटासा. म्हणूनच तुमच्या ताई सुटीच्या दिवशी वेळ काढून भेटायला यायच्यात.... कितीतरी प्रसंग लिहू शकत नाही वहिनी. म्हणूनच तुम्ही माझ्यासाठी एक आदर्श, संस्कारी शक्ती आहात.

त्यातच माझं कॉलेज आणि अभ्यास पण आपली भेट न चुकता मी घ्यायची. माझे आई -बाबा तुमच्या सर्वगुण संपन्नतेचं फार कौतुक करायचे.. म्हणायचे, ''संस्कारीत घरातली लेक आहे म्हणूनच स्वतःच्या कामात व्यस्त असते. फार सहनशील आहे मंजू ''.

एक थरारक प्रसंग नेहमी आठवतो वहिनी. मी कॉलेजला निघाले होते, मला गेटच्या बाहेर साकेतचा जोरात किंचाळण्याचा आवाज आला आणि तितक्यातच तुमचाही मला थरथर्त्या स्वरात रडण्याचा आवाज आला मी तसेच तुमच्या गेटमधून आत आले तर साकेतच्या छोट्याश्या हातावर किती मोठा पाटा पडला हे समजलं. (तुमच्या घरात जे समोर राहत होते त्यांच्या दारात मधेच खूप मोठा पाटा होता हेच चित्र आजही समोर आले ) साकेतची अवस्था म्हणजे हाताची छोटी करंगळीवर हा आघात. तुम्ही ते बघूनच घाबरल्या वहिनी. मी त्याच अवस्थेत साकेतला जवळ घेऊन आपण जवळच्या हॉस्पिटलमध्ये पायी गेलोय. सारखं जाणारं लेकराचं रक्त बघून तुमची अवस्था आजही आठवते वहिनी. इतक्या छोट्या करंगळीला तेव्हा डॉ




नी स्टीचेस दिले.आणि हा प्रसंग डोळ्यासमोर आजही जसाच्या तसा. छोटासा साकेत कितीतरी वेदना चुपचाप सहन करीत होता. इतके सारे झाल्यावर त्याला तुमची काळजी. आपण दोघींनी असे कितीतरी वेळेवरचे प्रसंग एकमेकींच्या सोबतीने सांभाळले. म्हणूनच तुम्ही नेहमी बोलायच्या की, ''बाली, तुला देवाने मला साथ द्यायला बनवले ''. अश्यातच माझं लग्न झालं.... आणि आपण थोडं दुरावलोय. (मनाने नाहीच) मी सुटीच्या दिवशी यायचे तर आपली भेट मनसोक्त व्हायची. पण तुम्ही फार काळजीत दिसायच्या. किती त्रासदायी दिवस होते वहिनी ते... अजूनही आठवले की कशातच मन लागत नाही.. तुमचे दादा -वहिनी आले की त्यांना कसं सांगावं हेच कळेना. सासर -माहेर सुरक्षित ठेवणाऱ्या स्वामिनी आहात तुम्ही.. माझ्यासाठी दैवी देणगी आहात तुम्ही वहिनी. शेवटी नको तेच झालं... घर गेलं की काय होतंय हे आता जास्त समजते. तुम्ही माहेरी गेल्या की तेच ते मनात यायचं की आता वहिनीला त्यांचे बाबा नाहीच पाठवणार. तुमच्या हातच्या पदार्थांची आठवण यायची. तुम्ही नसल्या की दादा तुमच्या कलागुणांचं फार कौतुक करायचे.

पण एकच गुणामुळे व्यक्ती आपलं नाव लिखित करतो. नाहीतर दादा स्वभावाने छान होते वहिनी. तुम्ही दादाला जसं राहायला आवडते तसंच राहायच्या. त्यांच्या प्रत्येक आवडी जपायच्या. पण नियती पूर्ण सुख अनुभवू देत नाही.

तुमच्या नावे तर या नियतीने पूर्णतः संघर्ष लिहून ठेवलाय... कमी वयात दादांचं जाणं. तुमचं आयुष्य उध्वस्त होणं . लेकरू छोटं असतांना कितीतरी खडतर प्रसंगातून चालणे किती अवघड. अजूनही ते दिवस आठवले की धडधड होते. पण तुम्ही आमच्यासाठी प्रेरणा बनल्यात वहिनी. इतक्या कमी वयात खंबीर राहून स्वतः चं अस्तित्व निर्माण केलं. समाजात सन्मानाचं स्थान मिळवलं. कित्येक राज्यस्तरीय स्पर्धेतून नंबर्स मिळवलेत.. मात्र तुमचे बाबा तुमच्याच काळजीत गेलेत वहिनी. तुम्ही तेव्हा फार खचून गेलेल्या होत्या. तुमच्या आई पण सारखी तुमचीच काळजी करीत राहायच्या. आई जाणं म्हणजे आयुष्य थांबतं... हे मी अनुभवातून बोलते वहिनी. तुम्ही इतकं सारं दुःख गिळून पुन्हा घरी पेंटिंग क्लासेस घ्यायला लागल्यात.. सारखे क्लासेस घेऊन कित्येक मुलींना स्वतःच्या पायावर उभं केलं..संघर्ष जरी संपला नाही तरी एक आदर्श लेकरू (साकेत ) घडवलं. अर्थातच तुम्हाला माहेरची प्रचंड साथ तुमच्या बोलण्यातून जाणवते.. यातच समाधान आहे. तुमच्या प्रत्येक लिखाणातून जगण्याची नवी पालवी उदयास येते. तुमचे लिखाण कित्येक सखींना आयुष्य जगणं शिकवते... म्हणूनच नवरात्रीच्या निमित्याने का होईना मला मनातलं थोडं लिहिता आलं. वहिनी, आपण आता कितीतरी दूर राहतोय पण मनाने तितक्याच जवळ आहोत. आपल्या कोणत्याही सोहळ्याच्या निमित्याने भेटी होत असतात... ही प्रत्येक भेट मनभर सुख देते. तोच जिव्हाळा आपल्या नात्यातला ओलावा टिकवून आहे वहिनी. बाकी तर वेळ काढून मोबाईल आपला सोबती आहेच. तुमचे माझ्यावरील प्रेम कायम असेच राहो वहिनी. म्हणूनच आपले हे नाते जन्मोजन्मीचे आहे. आपल्या अंबादेवीच्या नऊ माळीपैकी माझी ही वात्सल्यात ओवलेली एक प्रभावी वहिनीसाठी अखंड आपल्या नात्यांचा सुगंध देणारी जिवाभावाची माळ....

# नवरात्र उत्सवात नारी शक्तीचा पैठणी देऊन सन्मान

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - नवरात्र उत्सवानिमित्त पिंपळे सौदागर येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका अनिता काटे आणि चॅलेंजर पब्लिक स्कूलचे संचालक संदीप काटे यांच्यावतीने आयोजित दांडिया समारोहात पिंपळे सौदागर मधील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या नऊ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला.



या प्रसंगी भाजपच्या नगरसेविका अर्चना तापकिर, आरती सोनदे, शालीनी गुजर तसेच पिंपळे सौदागर - रहाटणी महिला मोर्चाच्या मंडल अध्यक्ष कल्पना बागुल, सपना काटे आदिंची प्रमुख उपस्थिती होती. चॅलेंजर पब्लिक स्कूलच्या प्रांगणात दि. १६ ते १८ ऑक्टोबर या दरम्यान तीन दिवस रोज सायंकाळी सात ते दहा या वेळेत झालेल्या महोत्सवात नगरसेविका अनिता काटे यांच्यासह प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रांजली पाटील ( डॉक्टर ), अमरजा कुलकर्णी ( सॉफ्टवेअर इंजिनिअर ), कविता पाटील ( शिक्षिका ), नितू गुप्ता ( वकील ), प्रिया बिरारी ( नृत्यांगना ), श्रध्दा देशमुख ( समाजसेविका ), स्विटी तेजपाल ( फिजिओथेरपीस्ट ), उज्वला अढाऊ (उद्योजिका ), आरती कदम ( पोलिस ) या महिलांना ओटी भरुन पैठणी भेट देत सन्मानित करण्यात आले. तीन दिवसीय या महोत्सवात परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत देवीच्या चरणी विविध कलागुणांच्या माध्यमातून सेवा अर्पण केली. वैविध्यपूर्ण पोशाख आणि गीत - संगीताच्या तालावर नृत्याविष्कार सादर करीत आबालवृद्धांनी या महोत्सवाचा आनंद लुटला.

# नवरात्रोत्सवातील ''नवमी'' चे महात्म्य

**ज्योतिर्मय साहित्य**

अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून सतत नऊ दिवस आसुरी शक्ती असलेल्या महिषासुराशी घनघोर युद्ध करून नवव्या दिवशी म्हणजे नवमीच्या दिवशी सायंकाळी ब्रह्मा, विष्णू, महेश या आद्य देवांच्या पुण्यप्रकोपातून निर्माण झालेल्या दैवी शक्तीकडून हा मातलेला महिषासुर राक्षस मारला गेला, व आसुरी शक्तीचा सर्वनाश होऊन पुन्हा दैवी शक्ती स्थापन झाली व देवांना व भूतलावरील लोकांची आसुरी शक्तीतून मुक्तता झाली. ही दैवी शक्ती म्हणजे दुसरी -तिसरी कोणी नसून तीच दुर्गा,तीच जगदंबा, तीच कालिका व सर्व देवी होत. या नवरात्रोत्सव काळात आजही भक्त भाविक देवी मातांच्या मंदिरात जाऊन आजही समाजात असलेल्या आसुरी शक्तीच्या उच्चटन साठी देवी मातांची पूजा व प्रार्थना करतात व समाजात वाढत असलेल्या आसुरी शक्तीवर विजय मिळविण्यासाठी संघर्ष

करतात.

या नवमी दिनी सायंकाळी देवी माता मंदिरात व जेथे

नवरात्र उत्सवानिमित्त देवींची मूर्ती स्थापित केलेली

आहे तेथे होम हवन करतात. तसेच देशातील घरा-घरात सुद्धा देवी मातेची पूजा व होम होवन सायंकाळी करून ज्या प्रमाणे देवी जगदंबा मातेने आसुरी शक्तीचा नायनाट केला त्याचप्रमाणे होम हवन समयी प्रत्येक परिवारात देवींची प्रार्थना करून या जगतातिल आसुरी शक्तींचा नायनाट व्हावा




म्हणून देवींना साकडे टाकतात.

आज देशात, समाजात, मोठ्या प्रमाणात आसुरी शक्ती

डोके वर काढून सामान्य व गोरगरीब जनतेला त्रास देत आहेत,काही आसुरी शक्ती देशात अराजकता पसरवीत आहेत व जनसामान्यांना भयंकर त्रास देत आहेत,

ही महिषासुरी समाजातून उच्चाटनसाठी जगदंबा माता,दुर्गा माता, अंबा माता, कालिका माता तसेच सर्व देवी माता यांची मनोभावे पूजा, प्रार्थना करण्याची नितांत गरज आहे.या नवमी दिनी होम हवन समयी वाईट, अन्यायी अत्याचारी, दुष्ट वृत्ती,आसुरी वृतींचा नायनाट होओ अशी प्रार्थना करू या.

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### साधेपणातलं सौंदर्य आणि सामर्थ्य

एका गावात दोन माणसं राहत होती. एकाकडे मोठा बंगला, महागडी गाडी, ब्रँडेड कपडे आणि संपत्तीचा डामडौल होता. दुसरा साध्या घरात राहणारा, साधे कपडे घालणारा आणि आपल्या कामाशी प्रामाणिक असणारा माणूस होता.

गावात एखाद्याच्या घरी दुःख आलं, तर दुसरा माणूस सर्वांत आधी तिथे पोहोचायचा. कोणाच्या मुलाच्या शिक्षणासाठी मदत हवी असली, तर तो आपल्या परीने हात पुढे करायचा. वृद्ध माणसाला रस्ता ओलांडताना पाहिलं, तर त्याचा हात धरायचा. कुणाचं मन दुखावलं असेल, तर स्वतःहून माफी मागायला त्याला कमीपणा वाटायचा नाही.

एक दिवस गावात मोठा कार्यक्रम झाला. दोघांचाही सत्कार करण्यात आला. पहिल्या माणसासाठी टाळ्या वाजल्या; दुसऱ्या माणसासाठी लोकांच्या डोळ्यांत पाणी आलं.

कारण पहिल्या माणसाकडे पाहून लोकांना त्याची संपत्ती आठवत होती; दुसऱ्या माणसाकडे पाहून त्यांना त्याने दिलेलं प्रेम आठवत होतं.

त्या दिवशी गावाला एक गोष्ट समजली— माणसाची उंची त्याच्या राहणीमानाने ठरत नाही; तर त्याच्या वागण्याने, विचारांनी आणि दुसऱ्यांच्या आयुष्यात त्याने निर्माण केलेल्या आपलेपणाने ठरते.

आजच्या जगात प्रत्येकाला काहीतरी वेगळं दाखवायचं आहे. कपडे कसे आहेत, गाडी कोणती आहे, घर किती मोठं आहे, मोबाईल किती महागडा आहे, समाजात किती प्रतिष्ठा आहे—या गोष्टींवरून माणसाचं मोल ठरवण्याची सवय वाढत चालली आहे.

दुसऱ्यापेक्षा सुंदर दिसावं, अधिक श्रीमंत वाटावं, अधिक प्रसिद्ध व्हावं, यासाठी माणूस धडपडतो आहे. या धडपडीत तो कधी स्वतःच्या स्वभावापासून दूर जातो, तर कधी दुसऱ्याचं अनुकरण करताना स्वतःचं वेगळेपणच हरवून बसतो.

पण खऱ्या सौंदर्याला दिखाव्याची गरज नसते.

आईच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्यांत तिच्या त्यागाचं सौंदर्य असतं. वडिलांच्या कष्टाळू हातांत जबाबदारीचं सामर्थ्य असतं. साध्या कपड्यांत कामावर जाणाऱ्या प्रामाणिक माणसाच्या व्यक्तिमत्त्वात स्वाभिमान असतो. आणि कोणताही गाजावाजा न करता दुसऱ्याच्या डोळ्यांतील अश्रू पुसणाऱ्या हातांत माणुसकीचं खरं वैभव असतं. (क्रमशः)

# कुटुंबप्रमुख हवा आहे! भाग १२ - मनाच्या श्लोकांतून जीवनदर्शन

**ज्योतिर्मय साहित्य**

रविवार असूनही श्रीराम आणि श्रुतकीर्ती लवकर उठले. शाळेला सुट्टी असताना मुले एवढ्या लवकर कशी उठली, याचे पमेलाला आश्चर्य वाटले.

''आई, सुप्रभातम्!'' दोघेही एकदम म्हणाले.

''सुप्रभातम्!'' पमेलाने आनंदाने प्रतिसाद दिला. मुलांनी भारतीय पद्धतीने अभिवादन केल्यामुळे तिला खूप आनंद झाला. तितक्यात कृष्णकांतही तिथे आला.

''सुप्रभातम्, मुलांनो!''

''बाबा, सुप्रभातम्!''

''छान! आपली भाषा शिकल्याशिवाय आपली संस्कृती नीट समजत नाही,'' कृष्णकांत म्हणाला.

''बाबा, आज तुम्हीही आमच्याबरोबर आजोबांकडून मनाचे श्लोक शिकणार का?'' श्रीरामने विचारले.

''आज घरातील कामे आणि दसऱ्याची तयारी करायची आहे. पण दिवाळीच्या सुट्टीत तुझी आई आणि मी आजोबांकडून संस्कृत स्तोत्रे व सूक्ते शिकणार आहोत,'' कृष्णकांत म्हणाला.

तितक्यात मामा आजोबा आणि आजी तिथे आले. आजीने श्लोकाच्या पहिल्या दोन ओळी म्हटल्या.

''प्रभाते मनी राम चिंतीत जावा।
पुढे वैखरी राम आधी वदावा।।''

श्रीराम आणि श्रुतकीर्तीने श्लोक पूर्ण केला.

''सदाचार हा थोर सांडू नये तो।
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो।।''

मुलांनी आजी-आजोबांना नमस्कार केला आणि आई-बाबांनाही नमस्कार केला.

''मुलांनो, तुम्ही असेच शिकत राहिलात, तर मला खूप आनंद होईल,'' आजोबा म्हणाले.

''आई-बाबा, तुम्ही आजी-आजोबांना नमस्कार का केला नाही?'' श्रुतकीर्तीने विचारले.

''हो, आमचे चुकले,'' असे म्हणत कृष्णकांत आणि पमेलानेही नमस्कार केला.

''कल्याणमस्तु!'' आजी-आजोबांनी आशीर्वाद दिला.

''चला मुलांनो, आता पुढील श्लोक पाहू या,'' आजोबा म्हणाले.

''आजोबा, आम्ही दूध पीत असताना श्लोक शिकलो, तर चालेल ना?'' मुलांनी विचारले.

''हो, देवाचे स्मरण केव्हाही करावे. त्यामुळे मन प्रसन्न राहण्यास मदत होते,'' आजी म्हणाली.

''आजोबा, मी नोंदवही घेऊन येतो,'' असे म्हणून श्रीराम धावतच खोलीत गेला.

परत आल्यावर आजोबांनी पुढील श्लोक सांगितला.




मना पापसंकल्प सोडूनि द्यावा।
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा।।
मना कल्पना ते नको विषयांची।
विकारे घडे हो जनीं सर्व ची ची।।

''मुलांनो, प्रत्येक कृतीचा आरंभ विचारातून होतो. मित्राने खेळात घेतले नाही म्हणून त्याच्याशी भांडणे, भावंडाचा मत्सर करणे किंवा दुसऱ्याच्या यशाचा द्वेष करणे, ही अयोग्य विचारांची उदाहरणे आहेत. अशा विचारांमुळे मन अस्वस्थ होते आणि वागण्यातही दोष निर्माण होतात, म्हणून अयोग्य संकल्प सोडून सत्य आणि चांगुलपणाचा मार्ग स्वीकारावा. रागाच्या भरात बोलण्यापूर्वी थांबणे, कृतीचे परिणाम विचारात घेणे आणि स्वतःची चूक मान्य करणे, ही मनाला योग्य दिशा देणारी कौशल्ये आहेत,'' आजोबांनी समजावून सांगितले.

''आजोबा, हा श्लोक मला खूप वैज्ञानिक वाटतो,'' श्रीराम म्हणाला.

''आपल्या प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेत खूप मोठा ज्ञानसाठा आहे. तो समजून घेण्यासाठी संस्कृत शिकणे उपयोगाचे ठरते,'' आजोबा म्हणाले.

''मग मीही संस्कृत शिकणार!'' श्रीराम उत्साहाने म्हणाला.

''छान! आता या शिकवणीचा आपल्या रोजच्या जीवनात उपयोग करून पाहा,'' आजोबा म्हणाले.

क्रमशः भाग - १३ मनोनिग्रह आणि संस्कृत संस्कार

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# व्हेज मंचुरियन

ज्योतिर्मय 📖 साहित्य

ही हॉटेल मध्ये जास्तीतजास्त लोकप्रिय असलेली सर्वांची लाडकी स्टार्टरची डिश आहे. हे इंडो-चायनीज स्टार्टर खाण्याची खरी लज्जत तर आता पावसाळ्यात किंवा थंडीच्या दिवसांत खाण्यातच असते

हॉटेलसारखे कुरकुरीत व्हेज मंचुरियन घरच्या घरी सोप्या पद्धतीने कसे बनवायचे

हे पाहायचे आहे ? चला मग लगेंच..

साहित्य:

मंचुरियन बॉल्ससाठी:

किसलेला कोबी व गाजर २ वाट्या प्रत्येकी,बारीक चिरलेली कांदापात अर्धा कप, बारीक चिरलेला लसूण १ चमचा,

मैदा किंवा एकदम बारीक कणिक ३ चमचे, कॉर्नफ्लोअर २ ते ३ चमचे, आले- लसूण पेस्ट १ चमचा, काळी मिरी पूड अर्धा चमचा, चवीनुसार मीठ, बॉल्स तळण्यासाठी तेल.

सॉस किंवा ग्रेव्हीसाठी:

बारीक चिरलेला लसूण १ चमचा, बारीक चिरलेले आलं १ चमचा, बारीक चिरलेली सिमलामिरची अर्धी वाटी,बारीक चिरलेली

कांदापात पाव वाटी, कॉर्न फ्लोअर १ चमचा,सोया सॉस १ चमचा, रेड किंवा ग्रीन चिली सॉस १ चमचा, टोमॅटो केचप १ चमचा, चवीनुसार मीठ.



कृती:

प्रथम आपण मंचुरियन बॉल्स बनवुन् घेऊ

त्यासाठी एका मोठ्या बाऊलमध्ये किसलेला कोबी, गाजर आणि कांदापात घ्यावी. त्यात मैदा, कॉर्नफ्लोअर,लसूण , आले-लसूण पेस्ट, काळी मिरी पूड, मीठ घालावे. नंतर सर्व साहित्य चांगले मिक्स करावे. मिठामुळे भाज्यांना पाणी सुटते. त्यामुळे पिठाचा गोळा बनेल. आता या मिश्रणाचे छोटे-छोटे बॉल्स तयार करावेत

एका कढईत तेल गरम करून, हे बॉल्स मध्यम आचेवर सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्यावेत आणि बाजूला काढून ठेवावेत.

आता आपण मंचुरियनसाठी थोडीशी ग्रेव्ही बनवून घेऊ.

दुसऱ्या कढईत २ चमचे तेल गरम करावे. त्यात बारीक चिरलेला लसूण आणि आलं घालून परतावे. मग त्यात सिमला मिरची आणि थोडी कांदापात घालून २ मिनिटे ह मोठ्या आचेवर परतून घ्यावे.

आता त्यात सोया सॉस, चिली सॉस आणि टोमॅटो सॉस घालून सर्व मस्त मिक्स करावे.

त्यानंतर कॉर्नफ्लोअर मध्ये अर्धी वाटी पाणी घालुन त्याची पेस्ट बनवुन ती कढईत घालावी. हे मिश्रण घट्ट होऊ लागेपर्यंत हलवावे. हे थोडेसे दाट झाले की त्या ग्रेव्हीमध्ये तळून घेतलेले मंचुरियन बॉल्स टाकावेत आणि १-२ मिनिटे मंद आचेवर शिजू द्यावेत. म्हणजे ग्रेव्ही मस्त आत पर्यंत मुरते आणि मन्चुरिअन सॉफ्ट आणि टेस्टी




बनतात. वरून बारीक चिरलेली कांदापात घालावी.

आता गरमागरम व्हेज मंचुरियन तयार आहे. हे एका सर्व्हिंग डिशमध्ये काढून सर्व्ह करावे.

वैशिष्ट्य:

हॉटेलमध्ये ही डिश समोर आली की पाहता पाहता फडशा पडतो. मसालेदार, आंबटगोड, तिखट सॉसमध्ये बुडवलेले व्हेज बॉल्स खायला खूपच छान लागतात. पुन्हा अजून खाण्याचा खूप मोह होतो,पण किंमत पाहून आवरता घ्यावा लागतो कधी कधी. पण या अचुक पद्धतीने बनवुन पहाच! अगदी हॉटेलसारखे टेस्टी व्हेज मंचुरियन घरच्या घरी बनवून मनसोक्त आस्वाद घेऊ शकतो. आता बनवून खात्री करूनच घ्या ना!

# ४ थे बांधिलकी ऑनलाइन कवयित्री संमेलन उत्साहात संपन्न, स्त्रीशक्तीचा रंगला काव्यगजर

ज्योतिर्मय 📖 साहित्य

अमरावती - ''बांधिलकी प्रतिष्ठान, तसेच बांधिलकी बहुउद्देशिय ट्रस्ट अमरावती'' यांच्या वतीने ४ थे जागतिक बांधिलकी ऑनलाइन कवयित्री संमेलन २०२६ नुकतेच अत्यंत उत्साहात संपन्न झाले.

आदिशक्तीचा जागर स्त्रीशक्तीचा काव्यगजर या संकल्पनेवर आधारित हे संमेलन रविवार, १७ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ८:०० वाजता गुगल मीट (गूगल मीट) या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर पार पडले. जगभरातील व महाराष्ट्रातील विविध भागांतून कवयित्री आणि साहित्यप्रेमींनी या आभासी मंचावर एकत्रित येत स्त्रीशक्तीचा जागर केला.

या दिमाखदार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी अकोला येथील नामवंत मा. प्रा. डॉ. ममता इंगोले महल्ले होत्या. संमेलनाचे उद्घाटन टोकियो, जपान येथून मा. उर्मिला देवेन यांच्या हस्ते करण्यात आले. तर स्वागताध्यक्ष म्हणून कॅलिफोर्निया, अमेरिका येथून मा. स्मिता भोस्कर चिद्रवार यांनी पद भूषविले. या जागतिक स्तरावरील ऑनलाईन उपक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून कल्याण (मुंबई) येथील मा. वर्षा ठकरूल आणि परतवाडा येथील मा. प्राचार्य शारदा गणोरकर लाभल्या होत्या. उपस्थित सर्वच मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून स्त्रीशक्तीच्या कर्तृत्वाचा आणि काव्याच्या ताकदीचा गौरव केला.

कार्यक्रमाची सुरुवात अतिशय भक्तीमय वातावरणात झाली. मा. सुनिता तायडे यांनी अत्यंत सुमधुर आवाजात स्वागतगीत सादर करून कार्यक्रमाची नांदी केली. त्यानंतर मा. ॲड. नीता प्रफुल्ल कचवे यांनी आपल्या प्रास्ताविकातून बांधिलकी प्रतिष्ठानच्या या उपक्रमामागची भूमिका आणि उद्देश स्पष्ट केला. संपूर्ण कार्यक्रमाचे अत्यंत अभ्यासपूर्ण आणि बहारदार सूत्रसंचालन मा. रोशनी कडू यांनी केले. शेवटी उपस्थित सर्वांचे आभार मा. कुमुद कोरडे यांनी मानले.

या संमेलनाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे निमंत्रित कवयित्रींचे काव्यवाचन. विविध सामाजिक, कौटुंबिक आणि स्त्री-जीवनावर आधारित दर्जेदार कविता सादर करून कवयित्रींनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. या संमेलनात खालील निमंत्रित कवयित्रींनी आपल्या कविता सादर केल्या: शिवांगी वेरूळकर, श्रीमती सुलोचना लडवे, वृषाली वानखडे, शालिनी कावरे, डॉ. राणी चौधरी, स्वाती सेलोकर, पद्मा याऊल, सुचिता टेमधरे, मीना पाटणे, शालिनी बोरखेडे, शारदा बरडे, ज्योती माथने सर्वच कवयित्रींच्या उत्स्फूर्त सादरीकरणामुळे हे ऑनलाइन संमेलन तांत्रिक सीमा ओलांडून रसिकांच्या मनाला भिडले. सर्वांच्या सक्रिय सहकार्यामुळे आणि डिजिटल माध्यमाच्या प्रभावी वापरामुळे हे ४ थे बांधिलकी ऑनलाइन कवयित्री संमेलन अत्यंत यशस्वी आणि संस्मरणीय ठरले.

































# महावितरणने जपली सामाजिक बांधिलकी; तीन गरजू कुटुंबांना सौरऊर्जेचा आधार

## 'सेवा पर्व' अंतर्गत अधिकाऱ्यांनी स्वतःच्या खिशातून भरले तीन लाभार्थ्यांच्या स्मार्ट सोलर योजनेचे कोटेशन

**ज्योतिर्मय साहित्य**

शाहूवाडी – सामाजिक बांधिलकी जपत महावितरणच्या कोल्हापूर ग्रामीण–१ विभागांतर्गत शाहूवाडी उपविभागातील अधिकारी व अभियंत्यांनी माणुसकीचे दर्शन घडविले आहे. 'सेवा पर्व' उपक्रमांतर्गत आर्थिक परिस्थितीमुळे सौरऊर्जा योजनेचा लाभ घेणे शक्य नसलेल्या तीन दारिद्र्यरेषेखालील () वीज ग्राहकांना मदतीचा हात देण्यात आला आहे. कार्यकारी अभियंता श्री. अजित अस्वले, शाहूवाडीचे उपकार्यकारी अभियंता श्री. प्रवीण कुंभारे आणि सहाय्यक अभियंता श्री. सुलतान शेळके यांनी स्वतःच्या खिशातून आर्थिक योगदान देत या तिन्ही ग्राहकांच्या प्रत्येकी १ किलोवॅट क्षमतेच्या स्मार्ट सोलर योजनेचे कोटेशन भरले आहे. लवकरच या ग्राहकांच्या घरांवर सौरऊर्जा यंत्रणा बसविण्यात येणार आहे.



ग्राहकांच्या सर्वेक्षणातून समोर आली गरजू कुटुंबांची परिस्थिती

संबंधित ग्राहकांना स्मार्ट सोलर योजनेसाठी आवश्यक असलेली २,५०० रुपयांची रक्कम भरणेही शक्य नसल्याचे सर्वेक्षणादरम्यान आढळून आले. सामाजिक भावनेतून कार्यकारी अभियंता श्री. अजित अस्वले, उपकार्यकारी अभियंता श्री. प्रवीण कुंभारे आणि सहाय्यक अभियंता श्री. सुलतान शेळके लाभार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

१. श्रीमती शारदा पांडुरंग जाधव, रा. माणगाव, ता. शाहूवाडी.२. श्रीमती सोनाबाई दत्तू पाटील, रा. भेडसगाव, ता. शाहूवाडी. ३. श्रीमती मालुबाई नाना मांगळूलकर रा. गोंडोली, ता. शाहूवाडी.

तिन्ही लाभार्थ्यांच्या घरांवर लवकरच प्रत्येकी १ किलोवॅट क्षमतेची सौरऊर्जा (किंमत ५०,००० प्रत्येकी) यंत्रणा बसविण्यात येणार आहे. सौरऊर्जेच्या वापरामुळे पारंपरिक वीजपुरवठ्यावरील अवलंबित्व कमी होण्यास आणि घरगुती वीजखर्चात बचत होण्यास मदत होणार आहे.

स्मार्ट सोलर योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन*

शाहूवाडी उपकार्यकारी अभियंता श्री. प्रवीण कुंभारे यांनी जास्तीत जास्त पात्र वीज ग्राहकांनी स्मार्ट सोलर योजनेची माहिती घेऊन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

तसेच माननीय कार्यकारी अभियंता श्री अजित अस्वले साहेब यांनी सर्व शाखाधिकारी व जनमित्र यांनी तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता सर्व शेतकऱ्यांना दर्जेदार विद्युत पुरवठा करण्यात यावा, त्यांच्या अडचणी वेळेत सोडविण्याचे आदेश दिले.

# मनोज अग्रवाल राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित !

**ज्योतिर्मय साहित्य**

नाशिक – अस्पायर फाउंडेशन,नाशिक या फाउंडेशनतर्फे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत केंद्रीय मुख्याध्यापक या पदावर कार्यरत असलेले श्री. मनोज अग्रवाल यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार२०२६ हा शिक्षण क्षेत्रातील मानाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.. सदरील पुरस्कार संजीवनी हॉल नाशिक येथे प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि भेटवस्तू असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये १८ वर्षे समर्पित भावनेने सेवा करून अनेक महत्त्वपूर्ण बाबीत मोलाची कामगिरी बजावणारे मुख्याध्यापक श्री मनोज अग्रवाल यांना सदरील पुरस्कार प्राप्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे मा. आयुक्त श्री. अमोल येडगे,उपायुक्त तथा शिक्षण विभागप्रमुख मा. श्री अंकुश पांढरे सर, शिक्षणाधिकारी माननीय श्री भारत तीनगोटे सर,प्रशासन अधिकारी मा. श्री संजीव सोनार,सहायक कार्यक्रमाधिकारी मा. श्री ज्ञानदेव सांगळे सर,शिक्षण विस्तार अधिकारी मा.डॉ. विजय कोल्हे, महानगरपालिकेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील इतर मान्यवर यांच्याकडून अभिनंदन करण्यात



आले. मनोज अग्रवाल यांचा मित्रपरिवार तसेच कुटुंबीय आणि नातेवाईक यांच्याकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अनेक प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये घटक संच विकासात मनोज अग्रवाल यांनी राज्यस्तरीय स्तरावर मोलाची कामगिरी बजावली आहे.तसेच राज्यस्तरीय तज्ञ मार्गदर्शक म्हणून अनेक प्रशिक्षणामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यामध्ये मनोज अग्रवाल यांनी केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यम, सेम इंग्रजी माध्यम आणि मराठी माध्यम या तिन्ही माध्यमातून अध्यापन करण्याचा चांगला अनुभव मनोज अग्रवाल यांच्या गाठीशी आहे.

# 'पुणे पुस्तक जत्रा' मध्ये प्रसिद्ध नृत्यांगिणा भक्ती नाईक यांची प्रकट मुलाखत

## साताऱ्यात गेली ३५ वर्षे तसेच २२ वर्ष सातारा पुणे असे दर आठवड्याला जाऊन येऊन नृत्य कलेचे पुढच्या पिढीला ज्ञानदान करणाऱ्या नृत्यसाधिका गुरू वैशाली पारसनीस यांची थोडक्यात ओळख...

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – नुकतेच गुरू वैशाली पारसनीस यांचा व्यक्तिक नृत्यप्रवास ऐकण्याचा आणि भरतनाट्यम चे नृत्य सादरीकरण पाहण्याचा योग पुणे पुस्तक जत्रा च्या व्यासपीठावर आला.

वैशालीच्या आईला लहानपणापासून नृत्याची खूप आवड आणि शिकण्याची पण तीव्र इच्छा असून तिच्या वडिलांनी तिला शिकून दिले नाही.. त्याकाळी नक्कीच नृत्याकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा होता आणि उच्च मध्यम ब्राह्मण कुटुंबामध्ये नृत्य शिकण्यास विरोध असे. त्यामुळे नृत्य शिकण्याची इच्छा आईची राहून गेली. वैशाली चे माहेर वझे. वडील स्त्रीरोगतज्ज्ञ होते आणि आर्मी मध्ये सर्विस करत होते. वैशालीच्या जन्माच्या वेळेसच आईने मनोमन ठरवले की हिला नृत्य शिकवायचे. नृत्याची आवड वैशाली मध्ये रुजवता यावी यासाठी तिची आई सातत्यपूर्ण प्रयत्न करत राहिली.. आर्मी सर्विस मुळे दर दोन वर्षांनी बदली व्हायची. वैशाली ने नृत्याचा श्रीगणेशा अवघ्या ६ वर्षाची असताना चेन्नई (मद्रास)ला पोस्टिंग झाले तेव्हा केले. त्यानंतर बेळगाव आणि मग वडिलांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेऊन कुटुंब नाशिकला स्थायिक झाले. इथे वैशालीने शालेय शिक्षणपूर्ण केले. पण प्रत्येक नवीन ठिकाणी शिक्षक शोधणे आणि क्लासला सातत्य ठेवण्याचे आव्हान आई पुढे असायचे. त्याकाळी म्हणजे ८० च्या दशकात नाशिकला असताना ५ वर्षात ३ शिक्षिका बदलल्या गेल्या.. थोडक्यात योग्य गुरू आणि शिक्षणाचे समाधान न मिळाल्यामुळे नृत्य शिक्षणाची ओढ वाढतगेली आणि जेव्हा बीकॉम का बी. ए करायची जेव्हा घरी चर्चा झाली तेव्हा वैशाली ने मी नृत्यच करणार हे जाहीर करून टाकले ! आईची जवळची मैत्रीण नलिनी चौधरी तेव्हा करियर चे मार्गदर्शन करायच्या. वैशालीच्या आई बाबांना रेग्युलर शैक्षणिक प्रवाहातच पुढचे शिक्षण घेऊ दे असे वाटत होते पण मैत्रिणी ने वैशालीला जे आत्ता आवडतेय ते करू दे असे सुचवले. अर्थात वैशालीला जे हवे होते तेच पथ्यावर पडले आणि मुंबईला डॉ. गुरू.कनक रेळे यांनी स्थापन केलेले महाराष्ट्रातील नृत्याचे पहिले कॉलेज नालंदा नृत्य कला महाविद्यालय बद्दल सांगितले. प्रथम नृत्यकलेचे असे कॉलेज आहे हेच मुळी माहिती न्हवते!! अर्थातच ते पहायची उत्सुकता वाढली. ते पाहण्यास वैशाली आणि तिची आई नाशिकहून मुंबईला गेल्या. ते पाहिल्यावर वैशालीने तिथेच नृत्याचे पुढचे शिक्षण घ्यायचे ठरवले. आई बाबांचे प्रोत्साहन आणि पाठिंब्यामुळे वैशालीने मंबई विद्यापीठाशी संलग्न नालंदा नृत्य कला महाविद्यालयात शास्त्रोक्त पद्धतीने शिक्षण घेण्यास प्रवेश घेतला. आईला वैशालीने मुंबईत हॉस्टेल मध्ये राहणे मान्य नव्हते आणि योगच म्हणायचा वैशालीच्या मोठया भावाचे तेव्हा मुंबईत बिऱ्हाड होते त्यामुळे त्याच्या कडे राहून वैशालीला हे शिक्षण पूर्ण करता आले. मुंबई विद्यापीठाची .. (नृत्य) ही पदवी प्रथम श्रेणीत मिळवून पुढचे शिक्षण घेण्यास शिष्यवृत्ती पण मिळाली होती पण मोठ्या भावाची हैदराबादला बदली झाली आणि वैशालीचे पुढचे शिक्षण घ्याची इच्छा पूर्ण होऊ शकली नाही.. त्यामुळे पदवीधर झाल्यावर परत नाशिकला परतणे प्राप्त झाले. १९९० लग्न होऊन वैशाली पारसनीस साताऱ्यात आल्या. साताऱ्यात शास्त्रीय नृत्यात पदवीधर होणे हे नवीनच होते . त्यात भरतनाट्यम सारख्या दाक्षिणात्य नृत्यशैली ओघानेच अनोळखी होती ! सासर मध्ये पण शास्त्रीय संगीताची प्रचंड आवड होती पण नृत्यशैली नवखीच ! एक कला म्हणून घरच्यांनी पाठिंबा आणि प्रोत्साहन दिले. शिकल्याचा सराव रहावा म्हणून ४ मुलींना येतं ते शिकवण्यास प्रोत्साहन दिले. पण नुसते क्लास घेऊन वैशालीला समाधान मानायचे न्हवते. तिला व्यक्तिक पुढे शिकायचे होते. घरच्यांच्या पाठिंब्यामुळे आठवड्यातून एकदा डॉ. गुरू सुचेता चापेकरांकडे नृत्याचे पुढचे मार्गदर्शन तिचे सुरू झाले. असे ४/५ वर्ष सातत्य आणि नृत्य शिकण्याची प्रबळ इच्छा सुचेता ताईंना तिच्यात दिसली आणि तिला ललित कला केंद्रात . साठी प्रवेश घेण्यास सुचवले. १९९७ साली पुणे विद्यापीठाचे पदव्युत्तर शिक्षण प्रथम श्रेणीत पूर्ण केले. या शास्त्रोक्त पद्धतीने नृत्याचे शिक्षण घेऊन साताऱ्या सारख्या लहान गावात १९९१ पासून नृत्याचे बीज रोवले , त्या बीजाचे रोपट्यात आणि कालांतराने वटवृक्षात रूपांतर झाले आहे.. ज्या गावाला शास्त्रीय नृत्यकलेची काहीच पार्श्वभूमी न्हवती त्या गावात शास्त्रीय नृत्यात पण एक यशस्वी करियर होऊ शकते हा विश्वास पालकांमध्ये आणि विद्यार्थीनींमध्ये रुजत गेला आणि विद्यार्थिनींना एक नवीन दिशा मिळाली. निश्चितच याच्या पाठीमागे वैशाली ताईंची शिस्त, मेहनत, कष्ट, सातत्य, कलेची गोडी लागण्यासाठी अपार धडपड, विद्यार्थिनींना व्यासपीठ मिळावं म्हणून अनेक कार्यक्रम स्वखर्चाने आयोजित करून या शास्त्रीय नृत्यशैलीचा प्रचार आणि प्रसार अव्याहत त्यांनी चालू ठेवला आहे.

गुरू वैशाली पारसनीस यांनी उलगडला भरतनाट्यमशैली मधील रचनांच्या सादरीकरणातील अंतर्भूत असलेला

आध्यात्मिक प्रवाह.... मूर्ततेकडून अमूर्ताकडे ....

मुलाखतेची सुरुवात गुरू वैशाली पारसनीस यांच्या नृत्य सादरीकरणाने झाली. सरफोजी राजे भोसले यांचे मराठी काव्यातील गणेश कौतुकम आणि त्यालाच जोडून श्री समर्थ रामदास रचित तांडव नृत्य करी या गणेशाच्या नर्तन करणाऱ्या मूर्त स्वरूपाचे सादरीकरण झाले.

भरतनाट्यमचा प्रवास हा मूर्ततेकडून अमूर्ताकडे, दृश्याकडून अदृश्याकडे आणि देहाकडून चैतन्याकडे जाणारा प्रवास आहे. भरतनाट्यम या दक्षिणात्य नृत्याला धार्मिक आणि अध्यात्मिक पार्श्वभूमी आहे. मुळातच ही नृत्यशैली वाढली जोपासली गेली देवालयात. शोडशोपचारातील १६व्या उपचारातील पूजेचा भाग म्हणून नृत्य गायन आणि वादन देवाला अर्पण केले जायचे. जे आपल्याला आवडते ते देवाला द्यायचे ही त्यामागची भावना. देवाची सेवा करण्यासाठी विशेष देवदासी नेमण्यात यायच्या. केवळ नृत्याचे काव्य लिहिण्यास किंवा नृत्य सादर करण्यास वेग वेगळ्या देवदासी नेमलेल्या असत.. कालांतराने ही प्रथा संपुष्टात आली. आज जरी ही नृत्यशैली देवालयाचा उंबरठा ओलांडून रंगमंचावर सादर होत असली तरी रंगमंचावर केवळ नृत्य सादर करणे असे होत नसून नृत्यांगना आपली कला देवालाच अर्पण करीत आहे हा त्या मागचा आध्यात्मिक भाव तोच राहिला आहे. थोडक्यात नृत्याच्या माध्यमातून एक कलाकार म्हणजेच एका जीवाला त्या परमात्म्याशी एकरूप होण्याचा अनुभव साधण्याचा प्रयत्न असतो.

जेव्हा कलाकाराचे शरीर आणि मन तादात्म्य पावते तेव्हाच ही एकरूपता घडते .

एक अतिशय समर्पक नृत्याच तंत्र शास्त्रात दिले आहे ..

आस्येनालम्बयेद्गीतं हस्तेनार्थं प्रदर्शयेत्।
चक्षुर्भ्यां दर्शयेद्भावं पादाभ्यां तालमाचरेत्□

मुखाने गाणं आळवलं पाहिजे , हस्तमुद्रांनी काव्याचा अर्थ दर्शवला पाहिजे, डोळ्यांतून भाव व्यक्त झाला पाहिजे तर पदन्यासातून ताल दाखवला पाहिजे.. पुढे असे नमूद केलाय...

यतो हस्तस्ततो दृष्टिः।
यतो दृष्टिस्ततो मनः।।
यतो मनस्ततो भावः।
यतो भावस्ततो रसः।।

यतो हस्तस्ततो दृष्टिः: जिथे हात किंवा मुद्रा असतात, तिथे डोळे (दृष्टी) असायला हवी

यतो दृष्टिस्ततो मनः: जिथे डोळे जातात, तिथे मन एकाग्र झाले पाहिजे।

यतो मनस्ततो भावः: जेव्हा मन एकाग्र होते , तेव्हाच भाव उत्पन्न होतो।

यतो भावस्ततो रसः: जिथे भाव असतो, तिथे खरा रस निर्माण होतो

थोडक्यात भरतनाट्यमची सुंदरता अशी आहे की, हे भाव केवळ शब्दांनी सांगितले जात नाहीत; ते डोळ्यांतून, मुखाभिनयातून, हस्तमुद्रांतून आणि संपूर्ण देहबोलीतून अनुभवायला मिळतात.

भरतनाट्यममध्ये सुरुवातीला आपण देहाच्या माध्यमातून व्यक्त होतो. हस्तमुद्रा, पदन्यास, नेत्राभिनय, मुखाभिनय आणि विविध अंगविक्षेप यांच्या साहाय्याने एखादी कथा, प्रसंग, देवतेचे रूप किंवा मानवी भावभावना आपण मूर्त स्वरूपात साकारतो. उदाहरणार्थ, कृष्णाचे रूप, त्याची बासरी, यमुनेचा प्रवाह किंवा राधेची विरहव्यथा आपण प्रेक्षकांसमोर दृश्यरूपात उभी करतो.

परंतु भरतनाट्यमचे खरे सौंदर्य केवळ हे दृश्य उभे करण्यात नाही. या दृश्याच्या पलीकडे जाऊन त्यातील भावाचा अनुभव देण्यात आहे. कृष्णाचे रूप दाखवताना आपण केवळ कृष्णाला दाखवत नाही, तर त्याच्याविषयीचे प्रेम, भक्ती आणि समर्पण प्रेक्षकांच्या मनात जागवतो. इथे मूर्त रूप हळूहळू अमूर्त भावनेत परिवर्तित होते.

मूर्तता म्हणजे जे डोळ्यांना दिसते; अमूर्तता म्हणजे जे मनाला जाणवते आणि अंतर्मनाला स्पर्शून जाते.

नृत्यांगनेच्या साधनेतही हा प्रवास घडत असतो. सुरुवातीला ती ताल, लय, पदन्यास, हस्तमुद्रा आणि तंत्र यांवर प्रभुत्व मिळवते. पुढे या तांत्रिक चौकटीतून भावाभिव्यक्ती फुलू लागते. आणि जेव्हा नृत्यांगना स्वतःचे अस्तित्व विसरून नृत्याशी एकरूप होते, तेव्हा नृत्य हे केवळ शरीराचे सादरीकरण राहत नाही; ती एक आंतरिक अनुभूती बनते.

या अवस्थेत नृत्यांगना भाव व्यक्त करत नसते, तर जणू त्या भावाचीच अनुभूती घेत असते. प्रेक्षकही केवळ सादरीकरण पाहत नाहीत, तर त्या अनुभूतीचे सहप्रवासी होतात. याच प्रक्रियेतून रसनिष्पत्ती घडते.

ललित कलांमध्ये कुठल्या ना कुठल्या प्रकारे मानवी भावभावनांचं प्रकटीकरण होत असतं. चित्रकलेत रंग आणि रेषांमधून भावना व्यक्त होतात, संगीतात स्वरांमधून त्या जाणवतात, तर नृत्यामध्ये शरीर, नेत्र, मुखाभिनय आणि हालचालींमधून त्या व्यक्त होतात.

भरतनाट्यममध्ये तर मानवी भावविश्वाला खूप महत्त्वाचं स्थान आहे. प्रेम, विरह, करुणा, आनंद, राग, भक्ती, वात्सल्य अशा अनेक भावना नृत्यातून व्यक्त केल्या जातात.

पण केवळ कलाकाराने भावना व्यक्त करणं पुरेसं नाही. ती भावना प्रेक्षकाच्या मनापर्यंत पोहोचली आणि त्यालाही त्या भावाचा अनुभव आला, तर तिथे रसनिष्पत्ती होते.

म्हणून वाटतं, कलाकाराची साधना आणि प्रेक्षकाची अनुभूती यांच्यामध्ये जो भावबंध निर्माण होतो, तिथेच कलेचं खरं सार्थक होतं.

या सगळ्या रसांच्या पलीकडे पाहिलं, तर नृत्यातून मानवी मनातल्या अनेक नात्यांचा आणि भावनांचा आविष्कार होताना दिसतो. त्यात रती, वात्सल्य आणि भक्ती हे भाव विशेषत्वाने जाणवतात.

रतीमधून प्रेम आणि अनुराग व्यक्त होतो, वात्सल्यातून आई–मुलाचं किंवा पालकत्वाचं प्रेम दिसतं, तर भक्तीमधून जीव आणि ईश्वर यांच्यातलं नातं व्यक्त होतं. भक्त कधी सखा, कधी दास तर कधी देवाशी मातृत्वाच्या नात्याने संवाद साधत असतो . पुढील तीन रचनांच्या सादरीकरणातून कृष्णाचे अलौकिक नातेच अनुभवायला मिळाले.

भरतनाट्यममध्ये नाट्य या प्रकारात येणाऱ्या पदम सारख्या रचनांमधून नायिका–नायक भाव अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात येतो. यात नायिका म्हणजे केवळ एक स्त्री नसून ती जीवात्मा (मानवी आत्मा) आहे, आणि नायक (बहुधा भगवान शिव किंवा विष्णू) हा परमात्मा (सर्वोच्च ईश्वर) आहे. नायिकेची नायकाला भेटण्याची ओढ म्हणजे मानवी आत्म्याची ईश्वराशी एकरूप होण्याची (मोक्ष मिळवण्याची) आध्यात्मिक धडपड आहे. या पदम सारख्या रचनांमधून शृंगार, वात्सल्य आणि भक्ती भाव प्रामुख्याने सादर केले जातात.

रती/शृंगार भावाचे सूक्ष्म आणि कलात्मक सादरीकरण करण्यासाठी जयदेवांच्या गीतगोविंदातील अष्टपदी अत्यंत प्रभावी आहेत.

'याहि माधव, याहि केशव' या अजरामर असलेल्या श्री जयदेव यांच्या गीतं गोविंदातील ही अष्टपदी या शब्दांमध्ये राधेच्या मनातील राग, मान, विरह आणि प्रेम या सगळ्याच भावनांचा सुंदर संगम आहे.

कृष्णाने आपली अवहेलना केली आहे, या भावनेने राधा व्यथित झाली आहे. तिच्या मनात कृष्णाविषयी प्रेम आहे, पण त्याच वेळी त्यांच्या वर्तनाची खंतही आहे. त्यामुळे ती कृष्णाला म्हणते

''याहि माधव, याहि केशव''

जा माधवा, जा केशवा आता माझ्याजवळ येऊ नका!

राधेचा हा मान म्हणजे केवळ राग नाही; तो प्रेमातून निर्माण झालेला हळवा रुसवा आहे. कृष्ण फक्त तिचाच होऊ शकतो, तो दुसऱ्या कोणाचाच नाही. हा मानी भाव राधेच्या आड येतंय आणि तिला कृष्णाच परमेश्वरीय रूप समजण्यास कठीण जातंय . जयदेवांनी राधेच्या या मनोवस्थेचे वर्णन अत्यंत सूक्ष्मपणे केले आहे. तिच्या शब्दांतून कधी संताप जाणवतो, कधी उपेक्षा, कधी विरहाची वेदना आणि कधी कृष्णावरील अतूट प्रेम.

या रचनेचे उत्कृष्टपणे सादरीकरण गायत्री जोशी हिने केले.

कृष्णभक्ती म्हटलं की आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो तो नटखट, खोडकर, मुरलीधर कृष्ण! पण याच कृष्णाचं एक रूप असंही आहे, जे केवळ भक्तीनेच नव्हे, तर मायेने आणि प्रेमाने हृदयाला स्पर्श करतंते म्हणजे बालकृष्ण आणि त्याच्यावर जीवापाड प्रेम करणारी यशोदा माई!

आई आणि बाळाचं नातं हे जगातील सर्वांत निरपेक्ष आणि सुंदर नातं. बाळ कितीही खोडकर असलं, तरी आईसाठी ते नेहमीच लाडकं असतं. त्याच्या प्रत्येक हालचालीत तिला आनंद दिसतो, त्याच्या प्रत्येक हाकेत तिला प्रेम जाणवतं.

अशाच वात्सल्यभावाने ओथंबलेली एक सुंदर कन्नड रचना म्हणजे 'कृष्णानी बेगने बारो'!

या पदामध्ये यशोदा आपल्या लाडक्या कृष्णाला, ''कृष्णा, लवकर माझ्याकडे ये!'' अशी प्रेमाने हाक देते. त्याच्या सावळ्या रूपाचं, कुरळ्या केसांचं, गळ्यातील अलंकारांचं आणि त्याच्या लोभस बालरूपाचं वर्णन करताना तिचं मातृहृदय जणू आनंदाने भरून येतं. या रचनेचे सादरीकरण अपर्णा.बी हिने अतिशय समर्पक असे केले.

पुढच्या भक्तिपदातील रचनेत 'क्षीरसागर शयना' यात

भक्त आणि ईश्वर यांच्यातील एक हळवा संवाद आहे. भक्त आपल्या मनातील आर्तता, अपेक्षा आणि विश्वास देवापुढे व्यक्त करतो.

क्षीरसागरात शेषशय्येवर विराजमान असलेल्या श्रीरामाला भक्त आर्तपणे विचारतो

''हे क्षीरसागरशयना रामा, माझ्या मनाला तुम्ही असे चिंतेत का ठेवता?''

ज्या प्रभूंनी गजेंद्राच्या हाकेला धावून जाऊन त्याचे रक्षण केले, ज्यांनी द्रौपदीची लाज राखली, आणि सीतेच्या शोधासाठी समुद्र पार करून आपली कीर्ती जगभर पसरवली

त्या करुणामय प्रभूंनी माझ्याकडे मात्र असे दुर्लक्ष का करावे? अशी भक्ताची आर्त विनवणी या पदातून व्यक्त होते.

इथे भक्ताच्या मनात तक्रार आहे, पण त्याहून अधिक आहे ईश्वरावरचा अढळ विश्वास.

''तुम्ही इतरांचे दुःख दूर केलेत, मग माझे दुःख का दूर करीत नाही?''या भावनेतून भक्त आणि भगवान यांच्यातील एक अतिशय जिव्हाळ्याचा संवाद उलगडतो. संत त्यागराजांनी रचलेल्या या पदाचे सादरीकरणात शरणागती, भक्ती, आर्तता आणि ईश्वरकृपेची आस अत्यंत सुंदरपणे व्यक्त होते. सादरीकरण गायत्री जोशी. भरतनाट्यमच्या पदम, वर्णम सारख्या रचनांमधून मूर्त स्वरूप म्हणजेच यांसारख्या रचनांमध्ये आपण मानवी भावभावनांचे दर्शन घडवतो. प्रेम, भक्ती, वात्सल्य, विरह अशा भावनांना हस्तमुद्रा, नेत्राभिनय, मुखाभिनय आणि देहबोली यांच्या माध्यमातून मूर्त स्वरूप प्राप्त होते.

तर शुद्ध नृत्तच्या रचनांमधून जसे की जतीस्वरम , तिल्लाना सारख्या रचना अमूर्ताचा अनुभव देतात . हा एक सुंदर कलात्मक प्रवासच अनुभवायला मिळतो .

याउलट, तिल्लाना सारख्या नृत्यरचनेमध्ये भावनांच्या कथनापेक्षा नृत्याच्या लय, ताल, पदन्यास आणि अंगविक्षेपांमधून निर्माण होणाऱ्या सौंदर्याला अधिक महत्त्व असते. इथे एखादी विशिष्ट कथा किंवा भावना सांगितली जात नाही, तर नर्तकाच्या शरीरातून लय आणि संगीताचा एक अमूर्त आविष्कार घडत असतो. चित्रातील रेषा, आकार, आकृतीबंधांचा वापर इथे प्रकर्षाने जाणवतो. पण अमूर्त म्हणजे भावनाशून्य नव्हे. या सरळ , नागमोडी, अर्धवर्तुल रेषा विविध भाव दर्शवतात. तिल्लानामधील लयबद्धता, ऊर्जेचा आविष्कार आणि देहाच्या हालचालींमधूनही आनंद, उत्साह आणि चैतन्याची अनुभूती येते.

अशा प्रकारे, भरतनाट्यममध्ये आपण एका बाजूला भावनांना मूर्त रूप देतो, तर दुसऱ्या बाजूला नृत्याच्या शुद्ध लयकारीतून




अमूर्त सौंदर्याचा अनुभव घेतो.

शेवटी, नृत्य हे केवळ भावना व्यक्त करण्याचे माध्यम राहत नाही, तर ते भावनेच्या पलीकडे जाऊन एका शुद्ध कलानुभवापर्यंत पोहोचते. मूर्तातून अमूर्ताकडे आणि दृश्यातून अदृश्याच्या अनुभूतीकडे जाणारा हा प्रवास म्हणजेच भरतनाट्यमच्या कलात्मकतेचे वैशिष्ट्य आहे.

जेव्हा एखादी नृत्यांगना कृष्णाच्या वात्सल्याचे, राधेच्या प्रेमाचे किंवा भक्ताच्या समर्पणाचे सादरीकरण करते, तेव्हा ती केवळ एखादी कथा सांगत नसते. तिच्या अभिनयातून प्रेक्षक त्या भावविश्वात प्रवेश करतो. त्या क्षणी तो स्वतःचे व्यक्तिगत अस्तित्व विसरून त्या भावाचा आस्वाद घेऊ लागतो. नृत्यांगनेच्या भावाभिव्यक्तीतून रसोत्पत्ती होते आणि त्या रसास्वादातून रसिकाला जो अलौकिक आनंद प्राप्त होतो, तो ब्रह्मानंदाचा सहोदर मानला जातो.

भरतमुनींनी रसनिष्पत्ती समजावून सांगताना एक अतिशय सुंदर उदाहरण दिलं आहेपाककृतीचं.

जसं एखादा पदार्थ बनवताना त्यात वेगवेगळे घटक असतातमीठ, मसाले, तिखट, गोडपणा, आंबटपणाहे सगळे घटक योग्य प्रमाणात एकत्र आले, की त्या पदार्थाची एक वेगळीच चव तयार होते. आपण त्या चवीचा अनुभव घेतो.

अगदी त्याचप्रमाणे नाट्य किंवा नृत्यामध्येही विभाव, अनुभाव आणि संचारी भाव असे अनेक घटक एकत्र येतात आणि त्यातून प्रेक्षकाच्या मनात रसाची अनुभूती निर्माण होते. या अनुभूतीलाच आपण रसनिष्पत्ती म्हणतो.

म्हणून मला हे उदाहरण खूप सुंदर वाटतंजसं पदार्थाची चव फक्त एका घटकामुळे निर्माण होत नाही, तसंच नृत्यातला रसही फक्त एका भावामुळे निर्माण होत नाही; अनेक घटकांची सुंदर सांगड घातली की रसाची अनुभूती निर्माण होते. नृत्यातून रसनिष्पत्ती घडवताना चार प्रकारच्या अभिनयांचा खूप महत्त्वाचा वाटा असतोआंगिक, वाचिक, आहार्य आणि सात्त्विक अभिनय. आंगिक अभिनय म्हणजे शरीर, हातांच्या मुद्रा, नेत्र, मुखाभिनय आणि देहबोलीच्या माध्यमातून भाव व्यक्त करणं.वाचिक अभिनय म्हणजे शब्द, साहित्य, गीत, संगीत आणि आवाजाच्या माध्यमातून भाव पोहोचवणं. भरतनाट्यममध्ये नर्तकी स्वतः संवाद बोलत नसली, तरी पदाचं साहित्य आणि संगीत वाचिक अभिनयाला आधार देतात.

आहार्य अभिनय म्हणजे वेशभूषा, अलंकार, रंगभूषा आणि रंगमंचावरील सजावट. यामुळे साकारत असलेल्या व्यक्तिरेखेला आणि प्रसंगाला योग्य वातावरण मिळतं.

आणि माझ्या मते सर्वांत सूक्ष्म आणि महत्त्वाचा म्हणजे सात्त्विक अभिनयजो कलाकाराच्या अंतर्मनातून येतो. एखादा भाव आपण आतून अनुभवला, तर तो डोळ्यांत, चेहऱ्यावर आणि देहबोलीत आपोआप उमटतो.

हे चारही अभिनय जेव्हा एकत्रितपणे आणि योग्य प्रकारे वापरले जातात, तेव्हा कलाकाराचा भाव प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो आणि रसाची अनुभूती निर्माण होतेहीच रसनिष्पत्ती.

'ब्रह्मानंद सहोदर' म्हणजे ब्रह्मानंदाचा सहोदर म्हणजेच ब्रह्मानंदासारखा अनुभव देणारा, त्याच्याशी साधर्म्य असलेला आनंद.रसास्वाद हा कलानुभवातून प्राप्त होणारा आनंद आहे; तर ब्रह्मानंद हा आध्यात्मिक अनुभूतीशी संबंधित आहे. रसास्वादाच्या क्षणी व्यक्तीचा अहंभाव आणि व्यक्तिगत भावनांच्या मर्यादा काही काळासाठी विरघळतात. मन एका अलौकिक, निर्वैयक्तिक आनंदाचा अनुभव घेते.

म्हणूनच शास्त्रीय नृत्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून, ते कलात्मक अनुभूतीतून अंतर्मनाला स्पर्श करणारे आणि कधी कधी आध्यात्मिक आनंदापर्यंत घेऊन जाणारे माध्यम ठरते.

म्हणूनच, भरतनाट्यमचा अंतिम हेतू केवळ एखादी कथा सांगणे किंवा देवतेचे रूप साकारणे हा नसून, त्या रूपाच्या माध्यमातून अरूपाचा, त्या दृश्याच्या माध्यमातून अदृश्याचा आणि कलात्मक अभिव्यक्तीच्या माध्यमातून चैतन्याचा अनुभव देणे हा आहे.

अखेरीस, मूर्ततेकडून अमूर्ताकडे जाणारा हा प्रवास म्हणजे देहातून भावाकडे, भावातून रसाकडे आणि रसातून आत्मानुभूतीकडे जाणारी नृत्यसाधना होय.

कार्यक्रमाची सांगता एका शांतरसातील नृत्यप्रस्तुतीतून केली ज्यात एका भक्ताच्या मनातील आर्तता अनुभवता आली.. 'विश्वेश्वर दर्शन करो चल मन तुम काशी' या रचनेत कवी आपल्या मनालाच आवाहन करतोय

देवाचं दर्शन घ्यायला केवळ डोळे पुरेसे नसतात; त्यासाठी मनही तितकंच निर्मळ आणि भक्तिभावाने भरलेलं असावं लागतं. जेव्हा मन भक्तीत तल्लीन होतं, तेव्हा प्रत्येक दृश्यात ईश्वराचं अस्तित्व जाणवू लागतं. भक्त स्वतःच्याच मनाला सांगतोय हे मना, चल! काशीत जाऊन विश्वेश्वराचं दर्शन घेऊया. त्याच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक होऊया! सादरीकरण गुरू. वैशाली पारसनीस यांनी केले.

भरतनाट्यम हे केवळ नृत्याचे एक शास्त्र नाही; ते शरीर, मन आणि आत्म्याला एका लयीत आणणारी साधना आहे. आपण नृत्य करताना शरीराची हालचाल करतो, ताल आणि लय साधतो; पण हळूहळू ही बाह्य हालचाल अंतर्मुख होऊ लागते. 'नृत्य करणे' आणि 'नृत्यात विलीन होणे' यामध्ये जो प्रवास आहे, अध्यात्माचा प्रवास आहे...

मूर्ततेकडून अमूर्ताकडे ....

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559